नेमणे आहे
नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी तसेच न्यूज चॅनलकरिता प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

दैनिक
# जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.
सिमेंट पाईप | सेफ्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १७९ | रविवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## संमिश्र

### पेट्रोलसाठी अंदाधुंद गोळीबार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भेंडी :** शनिवारी सकाळी मध्य प्रदेशच्या भिंडमध्ये दोन तरुणांनी हेल्मेटशिवाय पेट्रोल न दिल्याबद्दल पंप कर्मचाऱ्यावर गोळीबार केला. आरोपीने बेकायदेशीर पिस्तूल आणि परवानाधारक बंदुकीतून सतत गोळीबार केला. कर्मचाऱ्याला गोळी लागली. जखमी कामगाराला जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, तेथून त्याला ग्वाल्हेर येथे रेफर करण्यात आले. ही घटना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७१९ वरील लोधी पेट्रोल पंपावर घडली.

### वाल्मीक कराडचा जामीन अर्ज फेटाळला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मीक कराड याचा जामीन अर्ज विशेष मकोका न्यायाधीश व्यंकटेश पटवदकर यांच्या न्यायालयाने फेटाळला. वाल्मीक कराडवर गंभीर गुन्हा असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

### दगडूशेठ गणपतीचे रुग्णालयात व्हर्च्युअल दर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** भक्ती आणि सेवेची उदात्त परंपरा कायम राखत, यंदा सलग १० व्या वर्षी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे इमर्सिव्ह दर्शन हे ज्यांना प्रत्यक्ष उत्सवात येणे शक्य नाही अशांसाठी ट्रस्टने उपलब्ध करून दिले आहे. व्हर्च्युअल रिॲलिटी द्वारे यंदाच्या सजावटीमध्ये प्रत्यक्ष आपण उभे आहोत तसेच थेट गुरुजींच्या शेजारी उभे राहून आरतीत सहभागी झाल्याचा अनुभव रुग्णांनी घेतला. रुग्णालयात असूनही बाप्पाचे दर्शन घेता आल्याने अनेकांचे डोळे पाणावले. मंगळवार पेठेतील कमला नेहरू रुग्णालय आणि कसबा पेठेतील सूर्या सह्याद्री रुग्णालयातील रुग्णांनी यानिमित्ताने दर्शनाचा आनंद घेतला.

पंतप्रधान मोदी चीन विमानतळावर पोहोचले
आणि त्यांचे भव्य स्वागत झाले.




# शिष्टमंडळाची चर्चा निष्फळ



## आज तिसऱ्या दिवशीही जरांगे आंदोलनावर ठाम

## कुणबी घोषित केल्याशिवाय हटणार नाही : जरांगे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई : मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे. काल त्यांच्या आंदोलनाचा दुसरा दिवस असून, यावेळी आरक्षणासंदर्भात सरकारने एक पाऊल टाकत शिंदे समितीने काल मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. भेटीनंतर जरांगे पाटील यांनी शिंदे समितीला अल्टिमेटम दिला. यासह जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेण्यास नकार दिला. आरक्षणाबाबत काम करणाऱ्या शिंदे समितीने ६ महिन्यापासून अभ्यास केला असेल तर आता अंमलबजाणी करावी. लगेच जीआर काढावा, असं म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी शिंदे समितीला एक दिवसाचा अल्टिमेटम दिला. सरकारने सर्व समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यावे. लगेच जीआर काढावा, तर मी लगेच आंदोलन सोडेन, असेही जरांगे पाटील यांनी शिंदे समितीला सांगितले.**

### तुम्हाला महाराष्ट्राने मुख्यमंत्री केले : जरांगे
### राज्य अस्थिर झाले तर देवेंद्र फडणवीस जबाबदार

अंमलबजावणी करायला हवी. कुणाच्या शब्दावर उपोषण मागे घेणार नाही. माझ्या समाजातील आंदोलकांवर हल्ला होता कामा नये. राज्य अस्थिर करू नका. राज्य अस्थिर झाले तर देवेंद्र फडणवीस जबाबदार असतील. तुम्ही मुंबईचा विचार करताय, पण महाराष्ट्राचे क्षेत्रफळ मोठं आहे. लोकसंख्या, महसूल, संख्या अन् राजकारणही. फक्त मुंबई तुमची नाही. तुम्हाला महाराष्ट्राने मुख्यमंत्री केले, असेही जरांगे पाटील म्हणाले.

सरकारकडे ६ ते ७ दिवस आहेत, जर आरक्षणाबाबत निर्णय झाला नाही तर मुंबईत पुन्हा अजून काही मराठा समाज बांधव येतील. पुढच्या शनिवारी आणि रविवारी एकही मराठा घरी दिसणार नाहीत, तेही मुंबईत दाखल होतील, असे जरांगे पाटील म्हणाले.

काल न्यायमूर्ती शिंदे यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी समितीच्या कामाची माहिती दिली. किती कुणबी प्रमाणपत्र वाटण्यात आलेत. किती नोंदी मिळून आल्या, याची माहिती देण्यात आली. सर्व समाजाला सरसकट ओबीसी प्रमाणपत्र देता येणार नाही. घरातील एका व्यक्तीला प्रमाणपत्र मिळेल, म्हणजेच जो कोणी अर्ज करेल त्याला कुणबी प्रमाणपत्र मिळेल.

**मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर काढा**

मराठवाड्यातील सर्व मराठा समाजातील लोकांना कुणबी म्हणा. तसेच मराठा आणि कुणबी एकच आहेत, असा जीआर सरकारने काढावा, अशी मागणी जरांगेंनी केली. दरम्यान बलिदान दिलेल्या कुटुंबियांना १० लाख रुपये व नोकरी देण्यात यावी. यावर सवाल करताना जरांगे शिंदे समितीवर संतापले. १३ महिन्यांपासून तुम्ही अभ्यास केला तर अहवाल देऊन टाका. यासाठी कालावधी लागतो. आता वेळ देणार नसल्याचं जरांगे पाटील म्हणालेत. मराठवाड्यातला मराठा समाज हा कुणबी आहे, त्या मागणीत कोणतीच तडजोड नसल्याचे जरांगे पाटील म्हणालेत.

शिंदे समितीचा अभ्यास झाला असेल तर त्याची अंमलबाजावणी करावी. सातारा आणि हैदराबाद गॅझेट लागू करत उद्यापासून प्रमाणपत्रे द्यायला सुरूवात करा. मराठावाड्यात ४७ हजार कुणबी नोंदी मिळाल्या. मिळालेल्या नोंदींची जरांगेंना शिंदे समितीकडून माहिती देण्यात आली. ज्यांना कुणबी प्रमाणपत्र हवे त्यांनी अर्ज करून ते घ्यावे. सर्व समाजाला सरसकट प्रमाणपत्र देता येणार नाही, असे शिंदे समितीने जरांगेंना सांगितले. त्यानंतर जरांगेंनी ३५० जाती ओबीसीमध्ये कशा घातल्या असा सवाल केला.

**मनोज जरांगे यांच्याकडून**



**मागण्यांचा पुनरुच्चार**

मनोज जरांगे पाटील म्हणाले, मराठा आरक्षणासाठीच्या आंदोलनादरम्यान ज्या आंदोलकांवर खटले दाखल करण्यात आले आहेत ते खटले मागे घेण्याची विनंती केली आहे. आंदोलनात बलिदान दिलेल्यांच्या कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरी दिली जावी, त्यांना अर्थसहाय्य केलं जावं ही आमची मागणी आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, आपण सरकारला सांगितले आहे की मराठवाड्यातील व पश्चिम महाराष्ट्रातील मराठा व कुणबी एकच आहेत हे सिद्ध झाले आहे, त्याची अंमलबजावणी करा; परंतु, गॅझेटसाठी एक मिनिटही मिळणार नाही. ते राज्य मंत्रिमंडळाची बैठक बोलावू असे म्हणत आहेत; परंतु या सगळ्यासाठी आम्ही १३ महिने दिले होते. मराठा व कुणबी एकच असल्याची शासकीय अधिसूचना जारी करा मी लगेच आंदोलन मागे घेतो, असे त्यांना सांगितले. सातारा व हैदराबाद संस्थानच्या गॅझेटियरची तातडीने अंमलबजावणी करा, आम्ही त्यासाठी एक मिनिटही देणार नाही; परंतु, औंध व बॉम्बे सरकारच्या गॅझेटियरसाठी दोन महिन्यांची मुदत देवू.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनी यासंबंधी सखोल आढावा घेतल्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावर लवकरच ठोस तोडगा निघण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, ओबीसी नेते यांनी जरांगे यांच्या आंदोलनाच्या विरोधात ओबीसी समाजाला रस्त्यावर उतरवण्याचा इशारा दिल्यामुळे हा तिढा अधिकच बिकट होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

शिंदे समितीने बॉम्बे गव्हर्नमेंट व औंध संस्थानच्या गॅझेटियरसाठी वेळ मागितला. या दोन मुद्यांवर वेळ देण्यासाठी आमची तयारी आहे. पण पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या मुद्यावर एक मिनिटही वेळ मिळणार नाही, असे जरांगे म्हणाले.

शिंदे समितीला इकडे चर्चेसाठी पाठवणे हा मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या राज्य सरकारचा, राज्याच्या राजभवनाचा व दोन्ही कायदेमंडळाचा केलेला अपमान आहे. कारण, हे काम शिंदे समितीचे नाही. मुख्यमंत्र्यांकडून राज्यपाल भवनाचा अपमान होत आहे. सरकारने राज्य मंत्रिमंडळाला चर्चा करण्यासाठी पाठवण्याची गरज होती. पण त्यांनी शिंदे समितीला पाठवले. हे साफ चूक आहे. इथे विधान मंडळ अस्तित्वात आहे. इथे राज्यपाल अस्तित्वात आहेत. त्यानंतरही त्यांनी शिंदे समितीला पाठवून राज्याचा अपमान केला. स्वतः देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राच्या कायदेमंडळाचा अपमान करण्याचे काम करत आहेत. कदाचित त्यांचे तोंड काळे झाले असेल म्हणून त्यांनी ही समिती पाठवली असेल, असे जरांगे म्हणाले.

शिंदे समिती आमच्याकडे वेळ मागत होती; पण आम्ही त्यांना एक तासाचाही वेळ दिला नाही. सगेसोयरेच्या मुद्यावर आमची त्यांच्याशी चर्चाच झाली नाही. मराठा व कुणबी एकच आहे. हा ५८ लाख नोंदींचा अहवाल आहे. आमचे म्हणणे आहे, त्याचाही एक जीआर काढून टाका. त्यासाठीही त्यांना थोडा वेळ हवा आहे. ते आता चर्चा करून येतो म्हणाले. पाहू केव्हा येतात. पण हे दोन गॅझेटियर, केसेस, बलिदान गेलेल्या कुटुंबाचा विषय व शिंदे समितीचा नोंदी शोधण्याचा विषय या प्रकरणात सरकारला एक तासाचाही वेळ दिला जाणार नाही. कारण, मराठवाड्यातील सगळा मराठा हा कुणबी आहे. सातारा संस्थानमध्ये सुद्धा पश्चिम महाराष्ट्रातील मराठा पान ४

## विविध मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा : ना. विखे पाटील

विविध मुद्द्यांवर आमची सकारात्मक चर्चा झाली. मराठा आरक्षणप्रश्नी आमची सकारात्मक भूमिका आहे. सर्व प्रश्नांची सोडवणूक व्हावी असं आम्हाला वाटतं. सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे, कोकण विभागाचे आयुक्त, आमच्या विभागाचे सचिव आणि इतर काही समिती सदस्य जरांगे यांच्याशी चर्चा करण्यासाठी गेले आहेत. तिथे त्यांच्यात चर्चा होईल आणि आणखी काही मुद्दे उपस्थित होतील. त्या मुद्द्यांवर आम्ही पुन्हा चर्चा करू. कालपासून मुंबईत पाऊस होता, त्यामुळे आंदोलकांची थोडी गैरसोय झाली आहे. परंतु, आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून आंदोलनाच्या ठिकाणी वीजेची व पाण्याची व्यवस्था केली आहे. तिथे स्वच्छता केली जात आहे. खड्डे बुजवण्याचं काम चालू आहे. आंदोलकांना त्रास होणार नाही, याची आम्ही पूर्ण खबरदारी घेऊ. पिण्याच्या पाण्याची, सांडपाण्याची, स्वच्छतागृहांची व्यवस्था केली जात आहे. कालच्या आमच्या बैठकीत मुंबईचे आयुक्त देखील उपस्थित होते. आम्ही त्यांना यासंदर्भातील आदेश दिले आहेत.

## मंत्र्यांनो, मराठा-कुणबी एकच

सरकारला आमचे सांगणं आहे, मागण्याची अंबलबाजवणी तात्काळ करा. मराठ्यांना सन्मान द्या, त्यांचा अपमान करू नका. काही मंत्री म्हणतात, एकाचे काढून दुसऱ्याला देऊ शकत नाही. पण आम्ही त्यांचे काढून आम्हाला द्या असे म्हणत नाही. महाराष्ट्रात गैरसमज पसरवू नका, आमचे आहे ते आम्हाला द्या, असंही जरांगे पाटील म्हणाले. त्यांचे काढून घेणं म्हणजे काय. ओबीसीला उदा. ३२ टक्के आरक्षण आहे, त्यामधील २० टक्के काढून घेणं अन् त्यांना १० टक्केच ठेवणं. मग त्याला काढून घेणं म्हणतात. मंत्री राज्यात संभ्राम निर्माण करत आहेत. ओबीसीमधील ३२ टक्के आरक्षणातील २० टक्के मराठ्यांना काढून द्या, असे आम्ही म्हणत नाही. आमच्या ज्या नोंदी आहेत, त्या ओबीसीमध्ये आहेत. आम्ही ओबीसीमध्येच आहे. मराठा आणि कुणबी एकच आहे. हे आमचं म्हणणं समजून घ्यावे. सरकारने संभ्रम निर्माण करू नये. राज्य अस्थिर करण्याचे काम मंत्र्यांकडून होऊ नये, असंही जरांगे पाटील म्हणाले.

## जरांगेंच्या आंदोलनाला दिला पाठिंबा?

आमदार उत्तम जानकर, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार नारायण पाटील, सरोज अहिरे, आमदार अभिजीत पाटील, आमदार विजयसिंह पंडित, आमदार प्रकाश सोळंके, आमदार राजेश विटेकर, आमदार राजू नवघरे, आमदार रोहित पवार, खासदार रविंद्र चव्हाण, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार कल्याण काळे आदींनीही जरांगे यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला आहे.

# केंद्रीय मंत्री शहांच्या विमानाचा तांत्रिक बिघाड

## एकनाथ शिंदेंनी दिले स्वत:चे चार्टर्ड विमान; गृहमंत्री सहकुटुंब गुजरातला रवाना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुंबईचा आपला दोन दिवसांचा दौरा पूर्ण करून गुजरातकडे प्रयाण केले, मात्र त्यांच्या सरकारी विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या चार्टर्ड विमानाने प्रवास करावा लागला.

आपल्या मुंबई दौऱ्यात अमित शाह यांनी राज्यातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत मराठा आरक्षणासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. दौऱ्यादरम्यान, अमित शाह यांनी सहकुटुंब मुंबईतील प्रसिद्ध लालबागच्या राजाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी आपल्या नातवाला कडेवर घेतले होते, ज्यामुळे आजोबा आणि नातवाच्या नात्याची प्रेमळ झलक पाहायला मिळाली. या क्षणाने अनेकांचे लक्ष वेधून घेतले.

दौरा संपल्यानंतर शाह मुंबई विमानतळावरून गुजरातला जाण्यास निघाले. मुंबई



विमानतळावर पोहोचल्यावर, अमित शाह यांच्या सरकारी विमानात तांत्रिक बिघाड झाल्याचे लक्षात आले. त्याचवेळी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चार्टर्ड विमान त्यांच्या पुणे दौऱ्यासाठी तयार होते. शाह यांच्या विमानात पान ४

# ...तर मराठा समाजालाही न्याय देता येईल

## मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षणाच्या मागणीवर शरद पवारांचा सल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली मुंबईतील आझाद मैदानात मराठा आरक्षणासाठी मोठे आंदोलन सुरू आहे. यावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. "जर तामिळनाडूमध्ये ७२ टक्के आरक्षण देता येऊ शकते, तर घटनेत बदल करून महाराष्ट्रातील मराठा समाजालाही न्याय देता येऊ शकतो. आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल, तर



घटनादुरुस्ती आवश्यक आहे," असे विधान त्यांनी अहमदनगर येथील कार्यक्रमात केले.

यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षांना स्पष्ट भूमिका मांडण्याचे आव्हान दिले होते. या पार्श्वभूमीवर पान ४

### अमित शहा-एकनाथ शिंदे यांच्यात मराठा आरक्षणावर बंद दरवाजाआड चर्चा

दरम्यान, मनोज जरांगेंच्या आंदोलनामुळे राज्य सरकारवर वाढत असलेल्या दबावाच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यात सह्याद्री अतिथीगृहावर सुमारे एक तासभर चर्चा झाली. या बैठकीत मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

# मार्केट कमिटीसाठी कोतकरांसह स्व. जगतापांचे योगदान

## आ. शिवाजीराव कर्डीले; नेप्ती उपबाजारच्या कांदा शेडचे भूमिपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भविष्यामध्ये आपणास मार्केटला जागा कमी पडणार आहे. त्यादृष्टीने नियोजन चालू आहे. मार्केट कमिटी वाढीसाठी भानुदास कोतकर तसेच स्वर्गवासी अरुण काका जगताप यांचेही मोलाचे योगदान असल्याचे प्रतिपादन आमदार शिवाजीराव कर्डीले यांनी केले.

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नेप्ती उपबाजार येथील सात एकर जागेतील कांद्याचे शेडचे भूमिपूजन आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी नेप्ती कांदा बाजारचे शिल्पकार भानुदास कोतकर, उदयनराजे कोतकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, दादाभाऊ चितळकर, बाजार समितीचे चेअरमन भाऊसाहेब बोठे, व्हाईस चेअरमन रभाजी सूळ, अभिलाष घिगे, रामजी साबळे, अरुण होळकर, विठ्ठल जपकर, अशोक झरेकर, देवाजी होले, नारायण आव्हाड, दादाजी दरेकर, हरिभाऊ कर्डिले, संतोष म्हस्के, सुधीर भापकर, संजय गिरवले, धर्मनाथ आव्हाड, रामदास सोनवणे, भाऊ गुरुजी भोर, मंजाबापू घोरपडे, संजय निमसे, मधुकर मगर, भाऊसाहेब ठोंबे, राजू आंबेकर, अभय घिगे, रामदास आंधळे आदींसह आदी मान्यवर उपस्थित होते.



आ. कर्डिले म्हणाले की, ज्यावेळेस नेप्ती बाजारची जागा घेतली होती. त्यावेळेस ही जागा अगदी शहराबाहेरची होती. आज ती हायवेमुळे शहरात आली आहे. आता ही जागा ही अपुरी पडत आहे व त्यासाठी आता पुन्हा शेजारील सात एकर जागेत आपण शेड बनवत असून त्यापैकी तीन एकर जागा पार्किंगसाठी आहे. उर्वरित चार एकर जागेमध्ये सात हजार स्केअर फुटाचे कांदा लिलाव शेड असणार आहे. या शेडमध्ये पहिल्या मजल्यावर ३६ गाळे ऑफिससाठी तयार करणार आहोत. शेडभोवती भोवती १५ ते २० मीटर रुंदीचे अंतर्गत रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, कंपाउंड, विद्युत व्यवस्था, स्वच्छतागृह करणार आहोत.

> चिचोंडी पाटील येथे ही उपबाजार सुरू करणार आहोत असून त्याचे भूमिपूजन १४ सप्टेंबरला करणार आहोत. तिथेही कांदा मार्केट सुरू करण्याचा विचार आहे. तसेच ज्या ठिकाणी कांदा जास्त पिकतो, अशा भागात जागा घेऊन त्या ठिकाणी ही मार्केट सुरू करण्याचा मानस आहे.
>
> **– शिवाजीराव कर्डिले, आमदार**

हा सर्व एकूण प्रोजेक्ट २६ कोटीचा आहे. पैकी १३ कोटी ७२ लाखाचे शेड आहे. शेड साठी पणन मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्याकडे कर्ज प्रस्ताव दाखल केला आहे. उर्वरित खर्च बाजार समिती स्वनिधी, बँक व सबसिडी मार्फत उभा करणार आहोत, असेही आ. कर्डीले म्हणाले.

# साळवे कुटुंबीयांची ना. आठवलेंनी घेतली भेट

## दलितांवरील भ्याड हल्ले सहन करणार नाही : मंत्री आठवले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जामखेड तालुक्यातील नान्नज येथे रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या कुटुंबीयांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. सर्व जखमींवर पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार सुरू असून, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी गुरुवारी (दि.२८ ऑगस्ट) पुणे ससून रुग्णालयाला भेट देऊन जखमींच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यांनी सर्व जखमींशी संवाद साधून त्यांना धीर दिला.



तलवार, कोयते आणि काठ्यांनी सज्ज असलेल्या दहा-बारा गुंडांनी साळवे यांच्या कुटुंबीयांवर जीवघेणा हल्ला केला होता. या हल्ल्यात महिलांसह सर्व कुटुंबीयांना गंभीर दुखापत झालेली आहे. अभिजीत साळवे यांच्यावर पंधरा-सतरा वार करून त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न झाला.

यशदीप साळवे, रत्नमाला साळवे, आदर्श साळवे, रेश्मा साळवे, दिग्विजय सोनवणे व सद्दाम पठाण हे देखील गंभीर जखमी झाले. सर्व जखमींवर पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार सुरू असून डॉक्टरांनी अभिजीत, यशदीप आणि रत्नमाला साळवे यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगितले आहे.

हल्लेखोर गुंडांवर मकोका अंतर्गत कठोर कारवाई करावी, सर्व आरोपींना तात्काळ अटक करून भारतीय दंड संहिता कलम १२० (ब) अंतर्गत कट रचल्याचा गुन्हा दाखल करावा, सुनील साळवे व त्यांच्या कुटुंबीयांना पोलीस संरक्षण द्यावे आणि सर्व आरोपींचा मोबाईल सीडीआर तपासून सूत्रधार कोण आहे? याचा शोध घ्यावा आणि त्यास तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या प्रसंगी परशुराम वाडेकर, संजय सोनवणे, आशिष गांगुर्डे, काकासाहेब खंबाळकर, श्रीकांत भालेराव, विजय वाकचौरे, महेंद्र कांबळे, शैलेंद्र चव्हाण, महिपाल वाघमारे, शशिकला वाघमारे यांच्यासह रिपाईचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केडगावात रंगली बास्केटबॉल स्पर्धा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** स्व. बापूराव भाऊराव कोतकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ केडगाव येथील देवी मंदिर परिसरात बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने ही स्पर्धा पार पडली. २० वर्षांखालील मुलांच्या व मुलींच्या अशा दोन गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेत शहर व उपनगरातील १३ संघांनी सहभाग नोंदवला.

दिवसभर रंगलेल्या या स्पर्धेत खेळाडूंनी दमदार खेळी करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. मुलांच्या गटात बॉलर्स संघाने विजेतेपद पटकावले तर मुलींच्या गटात एबीसी संघ विजयी ठरला. स्पर्धेचे उद्घाटन पंचायत समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर यांच्या हस्ते झाले.

# क्रीडा दिनानिमित्त रंगली भव्य क्रीडा रॅली

## हजारो खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग; प्रशिक्षकांचा विशेष गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** खेळांविषयी जागृती निर्माण व्हावी व क्रीडा संस्कृती वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शहरात विविध खेळांचे प्रात्यक्षिक सादर करत दि. २९ ऑगस्ट रोजी रॅली काढण्यात आली. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर, जिल्हा ऑलंपिक संघटना, एकविध खेळ संघटना, क्रीडा मंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये विविध खेळाचे एक हजारपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅलीचे नियोजन करण्यात आले होते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते जुने बस स्थानक येथील छत्रपती शिवाजी महाराज आणि ऑलंपिकवीर मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन तसेच झेंडा दाखवून या रॅलीचा प्रारंभ करण्यात आला.



> **ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक व प्रशिक्षकांचा गौरव**
>
> राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या हस्ते क्रीडा क्षेत्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक तथा प्रशिक्षक रावसाहेब बाबर, संजय धोपावकर, होनाजी गोडळकर, अनिल म्हस्के, सुरेश बनसोडे, संजय इस्सार आणि माजी जिल्हा क्रीडा अधिकारी अजय पवार यांचा विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी जि. प. शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, उप शिक्षणाधिकारी दरेकर, कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, संतोष वाबळे, प्रवीण कोंढावळे, क्रीडा अधिकारी प्रियांका खिंडरे, सागर पवार, मीना पाचपुते, साक्षी दळवी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते निर्मलचंद्र थोरात, सुनील जाधव, मनिषा पुंडे, अंजली देवकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ही रॅली माळीवाडा, पंचवीर चावडी, माणिक चौक, कापड बाजार, तेलीखुंट, नेता सुभाष चौक, चितळे रोड, चौपाटी कारंजा व जुन्या कोर्टाच्या मागच्या बाजूने वाडियापार्क क्रीडा संकुल येथे या रॅलीचा समारोप झाला. याप्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रम देखील रंगले होते.

# डेंग्यू मुक्तीसाठी घराघरात जनजागृती आवश्यक

## आयुक्त यशवंत डांगे; फकीरवाडा, मुकुंदनगर डेंग्यू मुक्त अभियान उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या वतीने डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियान सुरू असून विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी व आशा सेविका नागरिकांच्या घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी व जनजागृती करत आहेत. या उपक्रमामुळे डेंगूवर नियंत्रण मिळाले असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.





फकीरवाडा मुकुंदनगर येथे आयोजित अभियानात आयुक्त यशवंत डांगे, माजी नगरसेवक योगीराज गाडे, असिफ सुलतान, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. रजत येवले, मुख्याध्यापिका संगीता लांडगे, प्रभाग अधिकारी श्याम गोडळकर, दीक्षा घाटविसावे, नीता रसाळ, योगेश गुंड आदी मान्यवर उपस्थित होते.

माजी नगरसेवक योगीराज गाडे म्हणाले की, डेंग्यू मुक्त अभियानामुळे नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होत आहे. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचे योगदान मोठे असून त्यांच्या मेहनतीमुळेच साथीच्या आजारांवर नियंत्रण मिळण्यास मदत झाली आहे.

> विज्ञान शाप की वरदान? सोशल मीडियाचा वापर चांगल्या कामासाठी केल्यास वरदान, वाईट कामासाठी केल्यास शाप. मोबाईलकडे आकर्षित न होता अभ्यास व खेळाकडे लक्ष द्या. सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन समाजात जनजागृती करा. आपले घर व परिसर स्वच्छ ठेवा आणि आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळा.
>
> **– यशवंत डांगे, आयुक्त**

असिफ सुलतान म्हणाले की, आयुक्त यशवंत डांगे यांनी उपक्रम सुरू करून जनजागृती घडवली आहे. विद्यार्थी हे उद्याचे भविष्य असून त्यांच्यामध्ये समाजाप्रती बांधिलकी निर्माण होईल. मुकुंदनगर आरोग्य केंद्रातील डॉक्टर व सिस्टर हे नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत उत्तम सेवा देत आहेत. डॉ. सृष्टी बनसोडे यांनी डेंग्यू आजाराबाबत माहिती दिली, तर डॉ. सतीश राजुरकर यांनी आभार मानले.

# ‘वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’ने महावितरणचा झाला सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शून्य विद्युत अपघात जनजागृती अभियानातील विक्रमी लोकसहभागाची जागतिकस्तरावर नोंद घेत इंग्लंडमधील ’वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’ पुरस्काराने महावितरणचा सन्मान करण्यात आला.

या अभियानाचे मार्गदर्शक आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र तसेच अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालक राजेंद्र पवार यांनाही आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्राने गौरविण्यात आले.

मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात ’वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स’चे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह महावितरणच्या वतीने संचालक राजेंद्र पवार आणि विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी स्वीकारले.



यावेळी प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. दिवाकर सुकुल (लंडन), प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. मधू कृष्णन (अमेरिका), ज्येष्ठ संपादक व माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराच्या निवड समितीकडून महावितरणच्या विद्युत सुरक्षेच्या लोकाभिमुख अभियानाचे कौतुक करण्यात आले. यामध्ये वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे अध्यक्ष श्री. हेनरी आर (युरोप), प्रमुख पाब्लो (इंग्लंड), उपाध्यक्ष संजय पंजवानी, परीक्षक चंद्रशेखर शिंदे यांचा समावेश आहे. शून्य विद्युत अपघाताचे उद्दिष्ट हे महावितरणच्या कामाचा दैनंदिन भाग आहे. विविध उपक्रम व कार्यक्रमांद्वारे सातत्याने लोकसंवाद साधून विद्युत सुरक्षेची माहिती देत राहावी असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी संचालक राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक परेश भागवत, मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांची उपस्थिती होती.

# अनाधिकृत घरकुल जमीनदोस्त करा

## ‘सह्याद्री छावा’ची महावितरणकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील मौजे कामरगाव येथे विद्युत रोहित्राच्या बाजूला शासकीय जागेत अनाधिकृत घराचे बांधकाम त्वरीत थांबवून बांधण्यात आलेले सदरचे काम जमीनदोस्त करण्याची मागणी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.



संघटनेच्या शिष्टमंडळाने विद्युत महावितरणचे उपकार्यकारी अभियंता उमाकांत सपकाळे यांना निवेदन दिले.

यावेळी छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील, संघटनेचे दत्ता वामन, जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, धडक जनरल संघटनेचे श्रीधर शेलार, काकडे आदी उपस्थित होते.नगर तालुक्यातील कामरगाव येथे शासकीय मालकीच्या जागेत पहिल्यापासून विद्युत रोहित्र आहे. या रोहित्रापासून गावाला विद्युत पुरवठा केला जातो. पण सदरच्या शासकीय जागेत तेथील असणाऱ्या एका व्यक्तीने अनाधिकृतरित्या घरकुल बांधण्याचा प्रकार ग्रामपंचायत सरपंच यांना हाताशी धरून केला आहे. सदर रोहित्राला खेटून नवीन घर बांधण्यात आले आहे. विशेष म्हणजे सदरच्या घरकुलाचा पहिला एकच हप्ता रक्कम १५ हजार रुपये मिळालेली असून, सदरचे घरकुल जाणीवपूर्वक काम पूर्ण करून नंतर सदरच्या कामाचे हळूहळू फोटो काढून शासनाचे घरकुलासाठी अनुदान लाटून फसवणूक करण्याचा प्रकार सुरु असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

> प्रशासनाकडून कायद्याचा भंग
>
> केंद्रीय विद्युत सुरक्षा अधिनियम २०२३ अन्वये विद्युत रोहित्राच्या बाजूला ३.७ मीटर परिघांमध्ये कोणतेही घर बांधता येत नाही. या नियमाला डावलून ग्रामपंचायत सरपंच, घरकुलाचे लाभार्थी तसेच गावातील विद्युत विभागाचे कर्मचारी, कनिष्ठ अभियंता यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. केंद्रीय विद्युत सुरक्षा अधिनियमन २०२३ च्या नियमामधील कायद्याचा भंग केला आहे.

# निमगाव वाघामध्ये श्री गणेशाची प्राणप्रतिष्ठापना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शाडूच्या मातीच्या गणेश मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

डोंगरे वस्ती येथे ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते श्री गणेशाची स्थापना करण्यात आली.



यावेळी सचिव मंदा डोंगरे, राधिका डोंगरे, रघुनाथ डोंगरे, युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, तेजस्विनी डोंगरे, स्वराज डोंगरे, कांचन डोंगरे, अंजनाबाई फलके, कार्तिक डोंगरे, शिवाजी डोंगरे, किरण ठाणगे, दादा डोंगरे, रितेश डोंगरे आदी उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायत कार्यालय परिसरात सरपंच उज्वलाताई कापसे, उपसरपंच किरण जाधव, ग्रामपंचायत अधिकारी प्रविण पानसंबळ, डॉ. विजय जाधव, गणेश येणारे, उस्मान शेख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

# अध्यात्माची विचारधारा प्रत्येक कुटुंबियांपर्यंत पोहचवा

## आ. संग्राम जगताप; दिल्लीगेटच्या शनि मारुती मंदिरासाठी साउंड सिस्टीम भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नवीन मंदिरे उभे राहतात. पण जुन्या मंदिराकडे पण दानशूर लोकांनी लक्ष द्यावे. हरिपाठ, आरती, भजन यासाठी या साऊंडचा उपयोग होणार असून जर हरिपाठचा गजर परिसरात लोकांच्या, भाविकांच्या कानावर गेला. तर ते मंत्रमुग्ध होतात. अशी अध्यात्माची विचारधारा प्रत्येकाच्या कानापर्यंत पोचली तर सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन त्याचा फायदा प्रत्येकाच्या कुटुंबीयांना होतो, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

नगर येथील दिल्लीगेट येथील पुरातन शनी मारुती मंदिराकरिता टीव्ही सेंटर येथील विघ्नहर्ता प्रतिष्ठानच्या वतीने मंदिराकरिता दोन साऊंड, ॲम्प्लिफायर, माईक, माईक स्टँडसह सर्व सेट आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते काल हा सेट भेट देण्यात आला. यावेळी ते बोलत होते.





यावेळी माजी नगरसेवक संपत बारस्कर, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष योगेश सोनवणे, सुशांत जाधव, चंद्रकांत सबन, उदय खरमाळे, अमित भुतकर, रमेश गाजुल, मनोज लोंढे, शुभम आठरे, मनोज आंबेकर, राजेंद्र येंडे, अमोल नागपुरे, लक्ष्मण इगे, बाळासाहेब सांगुळे, महेंद्र मानकर, विठ्ठल शिरसुल, रामलिंग अष्टेकर, परेश पुरोहित आदीसह भाविक उपस्थित होते.

> मंदिराला आज साऊंड सिस्टिम दिली आहे. पुढील काळात मंदिराला रंगकाम पण करून देणार आहोत. तसेच मंदिराला जी काही मदत लागेल, ती विघ्नहर्ता प्रतिष्ठान देण्याचे प्रयत्न करेल. सावेडीतील टिव्ही सेंटर येथे असणारे हे मंडळ नवरात्र उत्सव, गणेश उत्सव, जयंती, श्री दत्त जयंतीया आदी उत्सव तसेच भाविकांना विविध धार्मिक ठिकाणी मोफत घेऊन जाते.
>
> **– योगेश सोनवणे**

# आज 'संडे ऑन' सायकल स्पर्धा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तालुका क्रीडा समिती संगमनेर आणि आमदार अमोल खताळ पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने आज रविवार ३१ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीड दिनानिमित्त संडे ऑन सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने संपूर्ण राज्यात राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्त संगमनेर तालुका क्रीडा विभागाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधत संगमनेर बस स्थानक ते घुलेवाडी, अशी ही संडे ऑन सायकल स्पर्धा होणार आहे या क्रीडा स्पर्धाचे उद्घाटन आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते होणार आहे.

या क्रीडा स्पर्धासाठी भरघोसअशी बक्षिसे ठेवली आहे. तरी क्रीडा स्पर्धेचा क्रीडा रसिकांनी या स्पर्धांचा अवश्यक लाभ घ्यावा असे आवाहन संगमनेर तालुका क्रीडा समिती वतीने करण्यात आले आहे.

# खैरी मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो

## जामखेड तालुक्यातील पाणीप्रश्न मार्गी; प्रकल्पाची पाहणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड तालुक्यात झालेल्या मान्सूनच्या पावसामुळे सातेफळ येथील खैरी मध्यम सिंचन प्रकल्प अखेर शंभर टक्के भरला. त्यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांनी आनंद व्यक्त केला. या प्रकल्पाची एकूण क्षमता ५३३.६ दशलक्ष घनफूट असून, सध्या तो पूर्ण क्षमतेने भरल्याने २९ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३.११ वाजता सांडव्यावरून ९ क्युसेकने विसर्ग सुरू होता.

शेती व सिंचनासह खर्डा परिसरातील अनेक गावांचा पाणीपुरवठा, तसेच सिंचनाची प्रमुख जबाबदारी या प्रकल्पावर अवलंबून आहे. या पाण्यामुळे दुष्काळग्रस्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जामखेड



तालुक्यात शेती बागायती झाली असून, ऊस व इतर पिकांचे क्षेत्रफळ वाढले आहे. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून कृषी अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. ग्रीन व्हॅली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खैरी प्रकल्पामुळे आजूबाजूच्या भागात हरित पट्टा निर्माण झाला असून, हा परिसर आज ग्रीन व्हॅली म्हणून ओळखला जातो. या प्रकल्पामुळे जामखेड तालुक्याला वेगळी ओळख मिळाली असून, तो तालुक्याचा मुख्य आर्थिक आधार बनला आहे.

खैरी मध्यम प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात वाढ होऊन धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने सांडव्यातून मोठ्या प्रमाणात नदीपात्रातील विसर्गात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राजवळील व प्रकल्पाच्या खालील बाजूस असणारी नदीकाठाजवळील गावे, वस्त्या, वाड्या, तांडे येथील शेतकरी व ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे.

### अधिकाऱ्यांनी केली पाहणी

तहसीलदार मच्छिंद्र पाडळे यांनी खैरी सिंचन शाखेचे अभियंता गणेश काळे, मंडळाधिकारी नंदकुमार गव्हाणे, रमेश कांबळे व शिवाजी थोरात यांच्यासमवेत खैरी मध्यम प्रकल्प, सातेफळ, तरडगाव व सोनेगाव प्रकल्पांना भेटी दिल्या. या दौऱ्यात सोनेगाव येथील बंधाऱ्याच्या बर्गे काढण्याबाबत संबंधित यंत्रणेला सूचना केल्या.

# कायमस्वरूपी ग्रामसेवक देण्याची मागणी

## खर्डा येथील ग्रामसभेत एकमुखी ठराव मंजूर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : तालुक्यातील खर्डा ग्रामपंचायतने आयोजित केलेली ग्रामसभा विविध प्रश्नांनी गाजली. खर्डा ग्रामपंचायतला सध्या असलेले ग्रामविकास अधिकारी बबन बहिर यांच्याकडे खर्डा ग्रामपंचायतचा प्रभारी चार्ज आहे. त्यांना यापूर्वी मूळ मुंजेवाडी, चोबेवाडी ग्रामपंचायतचे ग्रामसेवक म्हणून अधिकार आहेत. त्यामुळे त्यांना तिन्ही ग्रामपंचायतचा कारभार पाहण्यासाठी फारसा वेळ मिळत नाही. त्यामुळे खर्डा ग्रामपंचायतला स्वतंत्र कायमस्वरूपी ग्रामसेवक देण्याचा एकमुखी ठराव सर्व ग्रामस्थांनी हात वर करून पारित केला.



या विषयाशिवाय जलजीवन योजनेअंतर्गत झालेली पाईपलाईन हस्तांतर न करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच जुनी जीर्ण झालेली ग्रामपंचायत पाडून त्या इमारतीचे निर्लेकन करून गाळेधारकांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचे ठरले. खर्डा या ठिकाणी अंगणवाडीच्या संदर्भात अंगणवाडी सेविकांनी प्रश्न उपस्थित करून अंगणवाडी बांधून देण्याची मागणी केली. वडार समाजाला स्वतंत्र स्मशानभूमीची मागणी करण्यात आली. उर्दू शाळेला नवीन इमारतीची मागणी करण्यात आली. तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा थकलेला पगार येत्या १० सप्टेंबर पर्यंत संपूर्णपणे केला जाईल, असे आश्वासन ग्रामपंचायत अधिकारी बहिर भाऊसाहेब यांनी दिले. तसेच खर्डा सकल मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई येथे आमरण उपोषणाचा निर्णय घेतला आहे. तिथे जमलेल्या मराठा समाजाला सरकारने सुविधा द्याव्यात अशी मागणीचा ठराव मंजूर करण्यात आला.या ग्रामसभेच्या अध्यक्ष म्हणून सरपंच संजीवनी पाटील या होत्या तर ग्रामसभेचे प्रास्ताविक व आभार ग्रामपंचायत अधिकारी बबन बहिर यांनी मानले.

# विद्यार्थ्यांनी नवीन ज्ञान आत्मसात करावे : आहेर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून महाविद्यालयात उपस्थित राहून नवनवीन ज्ञान आत्मसात करून जीवनाचा उत्कर्ष करावा, असे आवाहन निघोज येथील मुलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी विद्यार्थ्यांना केले.




नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे श्री ढोकेश्वर महाविद्यालयामध्ये विज्ञान मंडळाचे उद्घाटन डॉ. सहदेव आहेर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कष्ट करण्याची क्षमता आहे, त्या क्षमता ओळखून विद्यार्थ्यांनी आत्मचिंतन करून आत्मविश्वासाने वाटचाल केली पाहिजे, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान शाखाप्रमुख प्रा. नामदेव वाल्हेकर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संकेत ठाणगे यांनी केले व कार्यक्रमाचे आभार कार्यक्रम समन्वयक प्रा. सीमा रोहोकले यांनी मानले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी ए. आय, चाट जीपीटी यासारख्या नवनवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून ज्ञान संपादन करा. सायन्स असोसिएशनच्या माध्यमातून विविध उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन इनक्युबेशन, इनोव्हेशन आणि एंटरप्रेन्योरशिप यासारख्या उपक्रमातून स्वयं रोजगार निर्माण करावा.

# सर्वेक्षण करणे म्हणजे पाणी आणणे नव्हे

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पारनेर** : सरकार कोणतेही असो, विखे परिवार ४० वर्षे सत्तेतच आहे. तरीही ते पारनेरला पाणी आणू शकले नाहीत. आता पाणी योजनेचे सर्वेक्षण करणे म्हणजे पाणी आणणे नाही. खा. नीलेश लंके यांनी एक वर्षात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वंदे भारत ट्रेनचा थांबा, पुणे-अहिल्यानगर रेल्वेच्या डीपीआरला मंजुरी, एमआयडीसीला जोडणारे रेल्वेमार्ग आणि इतर विकास कामे प्रगतीपथावर आणली असल्याचे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या माहिती तंत्रज्ञान समितीचे प्रदेशाध्यक्ष जितेश सरडे यांनी सांगितले.

माजी खा. डॉ. सुजय विखे हे पारनेर दौऱ्यावर असताना त्यांनी खा. नीलेश लंके यांच्यावर टीकेची झोड उठविली. त्यानंतर जितेश सरडे यांनी निवेदनाद्वारे त्यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले आहे. सरडे यांनी सभेची गर्दी, अहंकार, भ्रष्टाचार आणि ४० वर्षाच्या सत्तेतील निष्काळजीपणावर थेट हल्लाबोल करत सरडे पुढे म्हणाले की, आमच्या खर्चाचा विचार करू नका. गरीब शेतकऱ्यांच्या मुलांच्या प्रवेशासाठी घेतलेल्या लाखो रुपयांच्या देणग्या, शासकीय योजनांमधील पैसे, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, जर त्याहीपेक्षा जास्त खर्च लागला तर साखर कारखान्याच्या सभासदांच्या नावावर बनावट कर्ज घेऊन भरलेल्या तिजोऱ्यांमधून आमचा खर्च होत नाही. हा पराक्रम तुम्हीच करू शकता, असाही त्यांनी टोला लगावला.

# पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सहकार चळवळीचे जनक, शेतकऱ्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीस आयुष्य वाहिलेल्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ऑडिटोरियम, मेडिकल कॅम्पस, अहिल्यानगर येथे भव्यदिव्य वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन के. ई. एल. अभिमत विद्यापीठ, बेळगाव (कर्नाटक) चे कुलगुरू मा. प्रा. डॉ. नितीन एम. गंगणे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शालिनीताई



राधाकृष्ण विखे पाटील होत्या.

या सोहळ्यास ॲड. वसंतराव कापरे, मा. उत्तमराव कदम, सुभाष पाटील भदगले, आरती गंगणे, प्रा. डॉ. अभिजित दिवटे, प्रा. डॉ. पांडुरंग गायकवाड, प्रा. सुनील कल्हापुरे, प्रा. आर. के. पडळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### मुलींची टॉपर यादीत भर

गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करताना ''शिक्षणाच्या वटवृक्षाची पायाभरणी करणारे पदमश्री विखे पाटील यांचे दूरदर्शी विचार आजही मार्गदर्शक आहेत. टॉपर यादीत मुलींची भरीव संख्या पाहून अभिमान वाटतो. मी स्वतः प्रवरा पब्लिक स्कूलची माजी विद्यार्थिनी असल्याचा मला सन्मान आहे.'' असे अध्यक्षस्थानीय भाषणात शालिनीताई विखे पाटील यांनी नमूद केले.

ग्रामीण भागात मेडिकल कॉलेज उभारणे हे मोठे आव्हानात्मक काम आहे. संस्थेने हे कार्य प्रामाणिकपणे सांभाळून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आदर्श निर्माण केला आहे. येत्या काळात ही संस्था विद्यापीठ म्हणून कार्य करावी, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. नितीन गंगणे यांनी व्यक्त केली. डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सहवासामुळे जीवनात शिस्त आणि कार्यतत्परता आली. आजच्या पिढीला हे प्रेरणादायी ठरावे, असे मत संस्थेचे विश्वस्त ॲड. वसंतराव कापरे यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन विना दिघे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सतीश मोरे यांनी केले.

# डिझेल चोरणारी टोळी केली गजाआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : नगर- मनमाड महामार्गावर डिझेल चोरी करताना घातक शस्त्रांसह तिघांच्या टोळीला राहुरी पोलिसांनी रंगेहात पकडले. याप्रकरणी तिघांविरुद्ध राहुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, प्रवीण धनवटे (रा. बारागाव नांदूर) यांनी त्यांची गाडी राहुरी फॅक्टरी परिसरातील नगर- मनमाड महामार्गावरील एका हॉटेलजवळ उभी केली होती. यावेळी तीन अज्ञात इसमांनी घातक शस्त्रांसह गाडीवर हल्ला करत त्यातील डिझेल चोरले. घटनेची माहिती



मिळताच पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र जाधव आणि पोलीस हवालदार जालिंदर साखरे हे पेट्रोलिंग करत असताना घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत तिघा संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी आपली नावे पकरण राजेंद्र साळुंखे, सागर राजेंद्र सातपुते, दीपक राजेंद्र सातपुते सर्व रा. नांदुर्खी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर असे सांगीतले.तपासादरम्यान पोलिसांनी आरोपींकडून डिझेलचा ड्रम आहेत. या प्रकरणी प्रवीण आणि घातक शस्त्रे जप्त केली धनवटे यांच्या फिर्यादीवरून या तिघांच्या विरोधात राहुरी पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम ३०७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना अटक करून त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या कारवाईच्या पथकात पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव, गणेश वाघमारे, पोलीस नाईक जालिंदर साखरे, प्रमोद ढाकणे आणि अंबादास गीते यांचा समावेश होता.

# डी. फार्मसीत एमएसबीटीला मानांकन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : येथील मुळा एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फार्मसी या महाविद्यालयाच्या डी- फार्मसी अभ्यासक्रमास महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून उत्कृष्ट दर्जाचे मानांकन नुकतेच प्राप्त झाले. मार्च महिन्यामध्ये एमएसबीटीईचे तपासणी अधिकारी यांनी महाविद्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा शिक्षकांची शैक्षणिक पात्रता परीक्षा कार्यपद्धती निकाल भौतिक सुविधा व शैक्षणिक दर्जा या बाबी तपासून त्यांनी कशाच्या आधारावर सदर मानांकन दिले. परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन आजच्या स्पर्धात्मक युगात स्वतःचे भविष्य उज्वल करण्यासाठी संस्था नेहमीच प्रयत्नशील असल्याचे मुळा एज्युकेशन संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख यांनी सांगितले.

# गुहा ते शिबलापूर रस्त्याची दयनीय अवस्था

**जनता आवाज वृत्तसेवा**

**दाढ खुर्द** : संगमनेर तालुक्यातील गुहा ते शिबलापूर रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्याने प्रामुख्याने संगमनेरकडे जाणाऱ्या नागरिकांची मोठी वर्दळ असते. सदर रस्ता हा गेल्या अनेक महिन्यांपासून नादुरुस्त अवस्थेत असल्यामुळे नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधी यांच्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हा रस्ता नादुरुस्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना व रुग्णांना प्रवास करताना खूप त्रास होतो. यामुळे अनेकदा छोटे-मोठे अपघात देखील घडत आहे.

# नदीत वाहून गेलेल्या इसमाचा मृतदेह सापडला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : गणरायाच्या आगमनापूर्वीच रंगार गल्लीतील इसमाचा प्रवरा नदीत वाहून गेलेला मृतदेह चौथ्या दिवशी खराडी (ता. संगमनेर) नदीपात्रात आढळून आला आहे.

मंगळवारी रात्री ९ ते १० वाजेच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली होती. विजय संभाजी कुटे (वय ४२, रा. रंगारगल्ली) हे नेहमीप्रमाणे सुरक्षारक्षक म्हणून कामावर जात असताना, संगमनेर खुर्दकडे जाणाऱ्या प्रवरा नदीच्या छोट्या पुलावरून नदीत फुले टाकत असताना त्यांचा तोल जाऊन ते प्रवाहात वाहून गेले. त्यानंतर कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला, मात्र ते सापडले नाहीत. त्यानंतर प्रशासनाने आणि स्थानिक नागरिकांनी त्यांचा शोध घेण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.

ड्रोनद्वारेही शोध मोहीम राबवण्यात आली होती. परंतु नदीला पाण्याचा प्रवाह मोठा कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला, मात्र ते सापडले नाहीत. त्यानंतर प्रशासनाने आणि स्थानिक नागरिकांनी त्यांचा शोध घेण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. ड्रोनद्वारेही शोध मोहीम राबवण्यात आली होती.

नदीला पाण्याचा प्रवाह मोठा असल्याने शोध घेण्यात अडथळे येत होते, यामुळे तीन दिवसांपासून त्यांची कोणतीही माहिती मिळत नव्हती. अखेर शुक्रवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास नदीपात्रात एका शेताजवळ एका व्यक्तीचा मृतदेह स्थानिक नागरिकांना आढळला.

# गणेश विसर्जनासाठी १५ ठिकाणी कृत्रिम कुंडांची सोय

## विसर्जनवेळी गर्दी टाळण्यासाठी महानगरपालिकेडून उपाययोजना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : गणेशोत्सव २०२५ मध्ये मोठ्या संख्येने होणाऱ्या गणेश विसर्जनामुळे गर्दी टाळण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेने शहरातील विविध भागांमध्ये १५ ठिकाणी कृत्रिम गणेश विसर्जन कुंडांची सोय केली आहे. तसेच तीन पारंपारिक विसर्जन ठिकाणे असणार आहे.

महानगरपालिके च्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, सालाबादप्रमाणे यावर्षीदेखील पारंपारिक विसर्जन ठिकाणी विसर्जन होणार आहे. त्याचबरोबर नागरिकांना सोयीस्कर ठिकाणी विसर्जन करता यावे, यासाठी शहरात अनेक कृत्रिम विसर्जन कुंड उभारण्यात आले आहेत.

पारंपारिक विसर्जन ठिकाणे अहिल्यानगर - कल्याण रस्ता, बाळाजीबुवा विहीर, सावेडी, पाईपलाईन रस्ता, यशोदानगर विहीर, साईनगर, भोसले आखाडा, बुरूडगाव रस्ता येथील आर. सी.सी. हौद.

### कृत्रिम विसर्जन कुंडाची ठिकाणे

गांधीनगर रस्ता, बोल्हेगाव, भारत बेकरी चौक, सावेडी निर्मलनगर, साईबाबा मंदिर खुली जागा, सावेडी जॉगींग ट्रॅक मैदान, कल्याण रस्ता व सिना नदी मधील आयुर्वेद उद्यान मोकळी जागा, केडगाव देवी मंदिर समोरील जागा, भुषणनगर, पाण्याच्या टाकी शेजारी, केडगाव, सारसनगर, भिंगार नाला पुलाशेजारी, शिवनेरी चौक, स्टेशन रस्ता, गोविंदपुरा, यशवंत माध्यमिक विद्यालय (गाडे शाळा), भिस्तबाग महलजवळ, भिस्तबाग येथे दोन ठिकाणी, गांधी मैदान पटांगण, पांजरपोळ पटांगण, मार्केट यार्ड, आंबेडकर चौक, दाणेडबरा, मोतीनगर, खुली आंबेडकर सांस्कृतिक भवन, केडगाव देवी रस्ता.



# संपादकीय

## ही टिका कशासाठी?

न्यायाधीश हा ही माणूस असतो. त्याच्या हातूनही चुका होऊ शकतात; परंतु याचा अर्थ तो आरोपी आहे, असा होत नाही. निकाल चुकला, तर त्यावर भाष्य करण्याऐवजी अपील करायला हवे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी वारंवार सरकारच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. या पार्श्वभूमीवर सरकारमधील मंत्र्यांना तर जबाबदारीची जाणीव असायला हवी; परंतु ती तशी असल्याचे दिसत नाही. मंत्र्यांनी जबाबदारपणे विधाने करावीत, असा सल्ला सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेशचे मंत्री विजय शहा यांच्या एका वाचाळ वक्तव्यावर दिला होता. आता केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेले वक्तव्य अधिक गांभीर्याने घ्यायला हवे. अर्थात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर सत्ताधारी पक्षाचा गृहमंत्रीच टीका करायला लागला, तर न्यायव्यवस्थेवरचा सामान्य लोकांचा विश्वास उडायला वेळ लागणार नाही. न्यायालये धार्मिक बाबी पाहून निकाल देत नाहीत. मूलभूत तत्त्वे, मूलभूत हक्क, घटनाबाह्यता, पुरावे यांचा विचार करून न्यायालये निकाल देत असतात. शबरीमला मंदिरात मुलींच्या प्रवेशावर असलेली बंदी घटनेच्या १५, १६ कलमांचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली. सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्ण पीठाच्या निकालावर अपीलही करता येत नसल्याने तो अंतिम होता. असे असताना अमित शाह यांनी न्यायालयांनी धार्मिक बाबतीत निकाल देताना हस्तक्षेप करू नये, असे म्हटले होते. त्याच वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तसेच अन्य हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलन केले होते. न्यायालयाचा निकाल चुकीचा वाटल्याने भाष्य करणे वेगळे; परंतु मुलभूत हक्कांचा विचार करून दिलेल्या निकालावरही गृहमंत्री भाष्य करत असतील, तर त्याचे अनेक अर्थ निघतात. एक अर्थ न्यायालयावर दबाव आणणे आणि दुसरा अर्थ म्हणजे गृहमंत्री आणि त्यांच्या पक्षासह अन्य शाखांना घटनेपेक्षाही धर्म मोठा वाटणे असा होतो. सात वर्षांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर भाष्य केल्यानंतर आता शहा यांनी थेट सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्तींवर थेट टीका केली. हा ही औचित्यभंग आहे. निकाल पूर्ण न वाचताच एखाद्यावर टीका करणे आणि त्याच्याविषयी मने कलुषित करण्याचा प्रकार त्यांनी केला. राज्यघटनेने न्यायमंडळ, कार्यकारी मंडळ आणि कायदेमंडळ या तिघांच्या सीमारेषा ठरवून दिल्या आहेत. असे असताना मंत्रीच न्यायालयांवर टीका करत असतील, तर हा मर्यादाभंग आहे. त्यातही एखादा निकाल पूर्ण न वाचता त्यातील अर्धवट आणि सोयीचा भाग वाचून प्रचारात वापर करणे अधिक गंभीर आहे. अमित शहा यांनी हा प्रमाद केला आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या उमेदवारावर टीका करण्यासाठी काही मुद्दा नसल्याने अर्धवट माहितीच्या आधारे टीका करणे संबंधितांवर अन्याय करण्यासारखे आहे. नक्षलवाद्यांबाबत सरकारने एखादा निर्णय घेतला असेल आणि तो चुकीचा असेल, तर तो रद्द करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे. मात्र राजकारणासाठी आणि टीका करण्यासाठी अनेक मुद्दे असताना नक्षलवाद्यांशी संबंधित मुद्यांमध्ये राजकारण आणणे, चुकीचे आहे.

विरोधी पक्षाचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांनी काही एकट्याने कोणताही निर्णय दिलेला नाही. यापूर्वी त्यांनी दिलेल्या वेगवेगळ्या निकालांचा संदर्भ देऊन श्री. शहा यांच्यातर्फे अलिकडेच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले गेले. काँग्रेसही नक्षलवाद्यांची पाठीराखी असल्याचे दाखवण्याचा त्यांचा आटापिटा सुरू आहे. राजकीय पक्षांच्या चिखलफेकीत न्यायव्यवस्थेवरही चिखलफेक व्हावी, हे दुर्दैव आहे. शहा यांनी न्या. रेड्डी यांच्यावर टीका केल्यानंतर देशातील काही न्यायमूर्ती आणि ज्येष्ठ वकिलांनी त्यांच्याविरोधात भूमिका घेऊन त्यांचे वक्तव्य कसे चुकीचे आहे, हे सांगितले हे बरे झाले. न्या. रेड्डी यांच्याप्रती अभूतपूर्व एकता दाखवत सर्वोच्च न्यायालय आणि विविध उच्च न्यायालयांच्या १८ माजी न्यायमूर्तींनी २०११ च्या सलवा जुडूम निकालावर अमित शहा यांनी केलेल्या टीकेवर प्रतिक्रिया दिल्या. शहा यांच्या सुरात आता अन्य नेतेही सूर मिसळत आहे. छत्तीसगडच्या उपमुख्यमंत्र्यांनी त्याच्या पुढे मजल मारली. छत्तीसगडमधील नक्षलवादी बंडखोरीविरुद्ध सशस्त्र जागरुक गटांचा वापर बेकायदेशीर असल्याचे या निकालात नमूद करण्यात आले आहे. शहा यांनी न्या. रेड्डी आणि सर्वोच्च न्यायालयावर निकालाद्वारे 'नक्षलवादाला पाठिंबा' दिल्याचा आरोप केला. त्यांनी असेही म्हटले होते, की न्यायाधीश 'नक्षलवादी विचारसरणीने' प्रेरित आहेत. केरळमध्ये बोलताना त्यांनी श्री. रेड्डी हे नक्षलवादाला मदत करणारी व्यक्ती आहेत, असा आरोप केला. भाजपच्या नेत्यांनी अलिकडच्या काळात 'अर्बन नक्षलवाद' असा उल्लेख सातत्याने सुरू केला आहे. त्यांच्याविरोधात ते गुन्हे दाखल करायला लागले आहेत. तसे असल्यास शहा यांच्या हाती एवढ्या तपास यंत्रणा असताना त्यांच्याकडून न्या. रेड्डी यांच्याशी नक्षलवाद्यांशी संबंधित पुरावे गोळा करून गुन्हा दाखल केला जायला हवा; परंतु राजकारणासाठी कोणत्याही थराला जाणारे शाह तसे करायला तयार होणार नाहीत. 'सालवा जुडूम'वरील निकाल न्या. रेड्डी यांनी दिला नसता, तर २०२० पर्यंत नक्षलवादी दहशतवाद संपला असता, असे ते म्हणाले. न्या. रेड्डी व अन्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने हा निकाल २०११ मध्ये दिला होता. त्याचा संदर्भ अमित शहा आत्ता देत आहेत. ज्या विचारसरणीने सलवा जुडूमचा निकाल दिला, त्या विचारसरणीने प्रेरित असलेली व्यक्ती, असे शहा यांनी न्या. रेड्डी यांच्यावर टीका करताना म्हटले आहे. श्री. रेड्डी यांच्या समर्थनार्थ मैदानात उतरलेले न्यायमूर्ती आणि वकिल श्री. शहा सलवा जुडूमच्या निकालाचा चुकीचा अर्थ लावत असल्याचे म्हटले आहे. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठीचा प्रचार वैचारिक असू शकतो. तो सभ्यतेने आणि सन्मानाने करता येतो. कोणत्याही उमेदवाराच्या तथाकथित विचारसरणीवर टीका करणे टाळले पाहिजे. न्या. रेड्डी यांच्या निकालाचे पूर्ण वाचन न करताच शहा यांनी भाष्य केले. त्यांनी निकालाचा चुकीचा अर्थ लावल्याने न्यायिक स्वातंत्र्यावर काय परिणाम होऊ शकतो, याकडे न्यायमूर्ती वृंदानेही लक्ष वेधले. उच्चपदस्थ राजकीय नेत्याने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पूर्वग्रहदूषित चुकीचे अर्थ लावल्याने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# निर्यात वाढतेय, शेतीला दिलासा हवा



भारतीय अर्थव्यवस्था स्थिर आणि समर्थ असल्याचे चित्र दिसत आहे. मात्र भाववाढ कमी झाली असली, तरी शेतकऱ्यांच्या मालाला पुरेसा भाव मिळत नाही आणि अतिवृष्टीमुळे तो अडचणीतही आला आहे. शिक्षण, प्रवास आणि आरोग्यावरचा गोरगरिबांचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. अर्थव्यवस्थेच्या कमजोर स्थळांवर लक्ष्य केंद्रित केल्यासच गोरगरीब वर्ग आणि शेतकऱ्यांना खरा दिलासा मिळू शकेल.

२०२४-२५ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या देशातल्या प्रमुख कृषी पिकांच्या (खरीप आणि रब्बी) उत्पादनाचा दुसरा आगाऊ अंदाज पाहिल्यास भात, गहू, मका, भुईमूग आणि सोयाबीन तसेच तूर आणि हरभरा यांचे विक्रमी उत्पादन अपेक्षित आहे. देशातील एकूण अन्नधान्य उत्पादन ३३ कोटी टनांपेक्षा जास्त असणे, ही काही छोटी बाब नाही. त्याचप्रमाणे फळ आणि भाजीपाला उत्पादनातही झपाट्याने वाढ होईल. एवढेच नाही, तर २०२४-२५ या वर्षात सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) कृषी आणि संबंधित क्षेत्रांचे योगदान ४.६ टक्क्यांनी वाढू शकते. गेल्या वर्षी हा विकास दर २.७ टक्के होता. चांगला मॉन्सूनही कृषी विकासाला नव्या उंचीवर नेऊ शकतो. वाढते अन्नधान्य उत्पादन आणि मजबूत ग्रामीण अर्थव्यवस्था ही देशाची आर्थिक ताकद बनली आहे. सध्या देशातील अन्नधान्याचे साठे भरले असून धान्य निर्यात वाढत आहे. वाणिज्य मंत्रालयाने नुकत्याच जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार वाढत्या शुल्काची आव्हाने आणि जागतिक व्यापाराबाबत सतत अनिश्चितता असताना भारताच्या कृषी निर्यातीत २०२४-२५ या आर्थिक वर्षात जोरदार वाढ झाली आहे. देशाची एकूण कृषी निर्यात ५० अब्ज डॉलरच्या पुढे गेली आहे. भारताच्या कृषी क्षेत्राच्या निर्यातीत वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे तांदूळ निर्यातीत २० टक्क्यांची वाढ असल्याचे मानले जाते. २०२४-२५ मध्ये तांदळाची निर्यात २० टक्क्यांनी वाढून १२.४७ अब्ज डॉलरवर जाईल. धानाच्या भरघोस कापणीनंतर आणि मोठ्या प्रमाणात धान्य जमा होण्याच्या शक्यतांनंतर सरकारने सप्टेंबर २०२४ मध्ये तांदूळ निर्यातीवरील निर्बंध कमी करण्यास सुरुवात केली होती.

**परामर्श**

**– हेमंत देसाई, ज्येष्ठ पत्रकार**

२०२४-२५ मध्ये तांदूळ निर्यात वीस टक्क्यांनी वाढून १२.४७ अब्ज डॉलरपेक्षा जास्त झाली. एका दशकापासून भारत हा तांदळाचा सर्वात मोठा निर्यातदार राहिला आहे. अशा प्रकारे अन्नधान्याचा तुटवडा देशासाठी एक आव्हान बनल्यामुळे अन्नधान्याच्या अधिशेषाची उंची देशासाठी फायदेशीर ठरली आहे, तर भारताचे अन्न प्रक्रिया क्षेत्रदेखील भारताची आर्थिक ताकद बनले आहे. २०२३-२४ च्या तुलनेत २०२४-२५ मध्ये भारताची कृषी आणि प्रक्रिया केलेल्या अन्न उत्पादनांची निर्यात १३ टक्क्यांनी वाढून २५.१४ अब्ज डॉलर होण्याची अपेक्षा आहे.

कृषी निर्यातीला चालना देण्यासाठी सरकारने अनेक योजना आणि धोरणे राबवली आहेत. यात कृषी निर्यात क्षेत्राची स्थापना, पायाभूत सुविधांचा विकास आणि निर्यातदारांना प्रोत्साहन देणे यांचा समावेश आहे. जागतिक स्तरावर भारतीय कृषी उत्पादनांना मोठी मागणी आहे. त्यात बासमती तांदूळ, मसाले, चहा, कॉफी आणि ताजी फळे यांचा समावेश होतो. निर्यातीतील वाढीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनांना चांगला भाव मिळतो. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढते. कृषी निर्यात परकीय चलन मिळवून देते. त्यामुळे देशाच्या आर्थिक वाढीला हातभार लागतो. निर्यातीतील वाढीमुळे कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना मिळते. एकंदरीत, भारताची कृषी निर्यात सतत वाढत असून एकूण निर्यातीत कृषीक्षेत्राचा वाटा महत्त्वाचा ठरत आहे.

भारतातील अशा या कृषीमालाच्या बाजारपेठेवर अमेरिकेचे लक्ष आहे. त्यातूनच अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारतावर आणत असलेल्या दडपणाविरुद्ध केंद्र सरकारने ठाम राहायला हवे. अन्यथा, हजारो शेतकऱ्यांच्या जीवनावर विपरीत परिणाम होणार आहे. याच वेळी भारतातील निर्यातीबाबत अतिशय आश्वासक चित्र पुढे आले आहे. २०२४-२५ मध्ये भारताने त्या अगोदरच्या वर्षापेक्षा ०.१% जास्त म्हणजे ४३७.४ अब्ज डॉलर किमतीच्या मालाची निर्यात केली. आता एप्रिल ते जून २०२५ मधील ताजी आकडेवारी उपलब्ध झाली आहे. या तिमाहीमध्ये निर्यात ११२ अब्ज डॉलर्स वर गेली आहे. यामध्ये सर्वात स्पृहणीय बाब म्हणजे भारताच्या शेतीमालाच्या निर्यातीमध्ये ६.४ टक्के वाढ झाली आहे. २०२३-२४ मध्ये ती ४८.८ अब्ज बिलियन डॉलर्स होती तर २०२४-२५ मध्ये ती ५५ अब्ज डॉलर्सपर्यंत जाईल, असा अंदाज आहे. एप्रिल ते जून २०२५ दरम्यान कृषीमाल निर्यातीमध्ये ५.८ टक्के वाढ झाली आहे. जानेवारी ते जून २०२५ या सहा महिन्यांच्या काळाचा विचार केल्यास अमेरिकेला केल्या जाणाऱ्या भारताच्या शेतीमाल निर्यातीमध्ये २४ टक्क्यांची भरघोस वाढ झाली आहे. त्यावेळी ट्रम्प यांची घातक धोरणे अमलात आली नव्हती. एक लक्षात घेतले पाहिजे की डॉ. मनमोहन सिंग यांच्या कालावधीत शरद पवार कृषिमंत्रीपदी असताना भारताच्या शेतीमालाची निर्यात दहा वर्षांमध्ये साडेसात अब्ज बिलियन डॉलरवरून ४३ अब्ज बिलियन डॉलर्सवर जाऊन पोहोचली. अशा प्रकारची नेत्रदीपक कामगिरी त्या अगोदर कधीही झाली नव्हती.

२०१३-१४ ते २०२०-२१ दरम्यान, भारताच्या शेतीमाल निर्यातीमध्ये उतार आला होता. २०२२-२३ मध्ये त्यात पुन्हा तेजी आली. कारण जगभर शेतीमालाचे भाव वाढायला लागले होते. २०२३-२४ मध्ये मात्र भारतात दुष्काळ पडला. महागाई वाढू लागल्यामुळे नरेंद्र मोदी सरकारने गहू, तांदूळ, साखर, कांदा यासारख्या वस्तूंच्या निर्यातीवर बंधने आणली. यथावकाश हे निर्बंध हळूहळू कमी करण्यात आले. गेल्या वर्षी पाऊस चांगला पडल्यामुळे शेतीमालाचे उत्पादन वाढले. त्यामुळे भाववाढही कमी झाली. या वर्षीही चांगला पाऊस पडल्यामुळे सरकारला साखरेवरील निर्यात निर्बंध हटवणे शक्य आहे. २०२२-२३ मध्ये साखरेची निर्यात साडेपाच अब्ज डॉलर्स इतकी होती. गेल्या वर्षी ही निर्यात ७७ कोटी डॉलर्सवर येऊन ठेपली. मात्र मागील तिमाहीमध्ये बिगरबासमती तांदूळ, कॉफी, तंबाखू, फळे, भाज्या आणि सागरी उत्पादने यांच्या निर्यातीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. ब्राझिल आणि व्हिएतनाममधील कॉफीचे उत्पादन घटल्याने कॉफी निर्यातीच्या बाजारपेठेत भारताला मुसंडी मारणे शक्य होत आहे. अन्नधान्य आणि इंधनाच्या किमती लक्षणीयरीत्या घसरल्याने जूनमध्ये घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर ०.१३ टक्क्यांवर घसरला असल्याची सुवार्ता आहे. ऑक्टोबर २०२३ नंतर प्रथमच घाऊक महागाईदर शून्याखाली गेला आहे. या वेळच्या मे महिन्यात अन्नधान्य वस्तूंमध्ये १.५६ टक्के तर जूनमध्ये ३.७५ टक्क्यांची घसरण झाली. जूनमध्ये इंधन आणि विजेच्या किमतीही २.६५ टक्क्यांनी कोसळल्या तर उत्पादित वस्तूंच्या किमतीतील वाढ जूनमध्ये फक्त १.९७ टक्के होती. सणासुदीचे दिवस आल्यामुळे सर्वसामान्य जनतेला महागाईबाबत दिलासा मिळणे महत्त्वाचे आहे.

२०२४ च्या अर्थसंकल्पातच 'खाद्यतेल मिशन'ची घोषणा करून दहा हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. कडधान्यांमध्ये आत्मनिर्भरता साधण्यासाठीही सहा वर्षे कालावधीची दीर्घकालीन योजना राबवली जाणार आहे. संपूर्ण खाद्यतेल आत्मनिर्भरता पुढील वीस वर्षांमध्ये तरी शक्य नसली, तरी मागील अनुभव पहिल्यास कडधान्यांमधील आत्मनिर्भरता येत्या दोन वर्षांमध्ये गाठणे शक्य होईल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. कारण डाळींची टंचाई फार तीव्र नाही. तूर, मूग आणि मसूर या खाण्यासाठी वापराच्या दृष्टीने एकमेकींशी संलग्न असलेल्या डाळींचे एकूण उत्पादन ३०-३५ लाख टनांनी वाढले तरी ते पुरेसे आहे. कारण क्षेत्रवाढ आणि उत्पादकतावाढ असा दुहेरी प्रयत्न करून चण्याच्या उत्पादनातही १०-१५ लाख टन वाढ सहज शक्य आहे. म्हणजे एकूण अतिरिक्त उपलब्धता ५० लाख टनांची झाल्यास आपण किमान कडधन्यांच्या उत्पादनामध्ये आत्मनिर्भर होऊ शकू. कडधान्यांच्या क्षेत्रात २०१७ ते २०२१ या काळात भारत ८५ ते ९० टक्के आत्मनिर्भर होता. मागच्या अर्थसंकल्पात पंचवार्षिक कालावधीचे 'कापूस मिशन' सुरू करण्याची घोषणा झाली. त्यात उत्पादकतावाढ आणि शाश्वतता या बाबींवर भर देण्यात आला आहे. उत्तम दर्जाच्या कापूस उत्पादनावर लक्ष्य केंद्रित करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त मत्स्य उत्पादन आणि निर्यातीला उत्तेजन देण्यासाठी 'पंतप्रधान धनधान्य कार्यक्रमांतर्गत' शंभर जिल्ह्यांमध्ये उत्पादकतावाढ अभियान राबवले जात आहे.

भारतीय अर्थव्यवस्था स्थिर आणि समर्थ असून नवनव्या संधी उपलब्ध होत असल्याचे आशादायी चित्र रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी अलीकडेच रंगवले आहे. मात्र भाववाढ कमी झाली असली, तरी शेतकऱ्यांच्या मालाला पुरेसे भाव मिळत नाहीत आणि अतिवृष्टीमुळे तो अडचणीतही आला आहे. त्याचप्रमाणे देशातील उत्पादनक्षेत्राचा विकास अपेक्षेप्रमाणे नाही. शिक्षण, प्रवास आणि आरोग्यावरचा गोरगरिबांचा खर्च दिवसेंदिवस वाढत चालला आहे. अर्थव्यवस्थेच्या कमजोर स्थळांवर लक्ष्य केंद्रित केल्यासच गोरगरीब वर्ग आणि शेतकऱ्यांना खरा दिलासा मिळू शकेल. ट्रम्प यांच्या दादागिरीला प्रत्युत्तर दिल्यास शेतकऱ्यांचे हितसंबंध सुरक्षित राहतील.

पान १ वरून

पान १ वरून

पान १ वरून

## शिष्टमंडळाशी चर्चा निष्फळ

कुणबी आहे. जरांगे म्हणाले, खरे तर इथे सरकारने यायला हवे होते. हे शिंदे समितीचे काम नाही. कारण, हे काम शिंदे समितीचे नाही. सरकारला इकडे यायला तोंड नाही. त्यामुळे ते या समितीला पुढे करत आहे. मी त्यांना सांगितले की, सातारा संस्थान गॅझेटियरमधील सर्व मराठा हा कुणबीमध्ये बसतो. हैदराबादच्या गॅझेटियरनुसार मराठवाड्यातील मराठा समाज हा सगळा कुणबी आहे. आम्हाला हे आत्ता अंमलबजावणीसह लागू पाहिजेत. त्याच्यात आम्ही एक तासाचाही वेळ देणार नाही. राहिला विषय केसेसचा, तर केससही सरकारने सरसकट मागे घेतल्या पाहिजेत. नोकऱ्या व निधीचा विषय ही समिती मंत्रिमंडळापुढे मांडणार आहे, असे जरांगे म्हणाले.

मनोज जरांगे यांनी सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना आपण मराठा-कुणबी घोषित केल्याशिवाय जागा सोडणार नसल्याचे ठणकावून सांगितले. सरकारने हैदराबाद व सातारा गॅझेटनुसार नोंदी घ्याव्यात. मराठवाड्यातील मराठा समाजाला सरसकट कुणबी घोषित करावे. उद्या सकाळपासूनच सर्वांना कुणबी प्रमाणपत्र जारी करण्यास सुरुवात करा. मराठवाड्यातील सगळा मराठा समाज हा कुणबी आहे यावर आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही, असे जरांगे म्हणाले. त्यावर शिष्टमंडळाने असे करता येणार नाही असे म्हणाले. त्यानंतर जरांगे यांनी आपण मराठा कुणबी घोषित केल्याशिवाय आझाद मैदान सोडणार नाही, असे ठणकावून सांगितले.

**आमदार निवासात मराठा आंदोलकांचा गोंधळ –** दक्षिण मुंबईत सध्या खाऊ गल्ली बंद असल्यामुळे मंत्रालयाजवळ असलेल्या आकाशवाणी आमदार निवासच्या कँटीनमध्ये आंदोलकांनी जेवण्यासाठी गर्दी केली आहे. अचानक वाढलेल्या या गर्दीमुळे काही काळासाठी आकाशवाणी आमदार निवासाची कँटीन बंद करण्यात आली. यामुळे आंदोलकानी मोठा गोंधळ केला. आंदोलकांच्या गोंधळानंतर टप्प्याटप्प्याने कँटीनमध्ये जेवायला सोडायला सुरुवात केली आहे.

**सरकारच्या शिष्टमंडळाची जरांगेशी चर्चा सुरू –** सेवानिवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारचे शिष्टमंडळ आझाद मैदानावर जाऊन मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करत आहे. यावेळी न्यायमूर्ती शिंदे यांनी राज्यभरात आतापर्यंत मिळालेल्या कुणबी प्रमाणपत्राची माहिती दिली. मराठवाड्यात एकूण ४७ हजार कुणबी नोंदी सापडल्याचे म्हणाले. यावेळी शिंदे व मनोज जरांगे यांच्यात व्यासपीठावर माध्यमांपुढे चर्चा सुरू आहे. अत्यंत सौहार्दपूर्ण वातावरणात ही चर्चा सुरू आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन सुरू केले आहे. नोंदी मिळालेल्या ५४ लाख मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याची त्यांची मागणी आहे. ते पाहता सरकार दबावात निर्णय घेण्याची भीती ओबीसी समाजात आहे. मात्र दबावात येऊन निर्णय घेतल्यास वा तसे दिसल्यास आम्हीही आंदोलनाची तीव्रता वाढवू, असा रोखठोक इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी माध्यमांशी बोलताना दिला. सरकारने कुणबी आरक्षणाला धक्का लावण्याचा प्रयत्न केल्यास आम्हीही मुंबईत धडकू, असा सज्जड इशाराही तायवाडे यांनी यावेळी दिला. आंदोलकांसाठी पिण्याचे पाणी, शौचालयातील पाणी आणि निवाऱ्याची कोणतीही योग्य व्यवस्था नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे. याच कारणांमुळे संतप्त झालेले आंदोलक काल (शनिवारी) सकाळी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) स्थानकाबाहेरील रस्त्यावर उतरले. या परिस्थितीवरून ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. आंदोलकांना मूलभूत सोयीसुविधाही पुरवता येत नसल्याने त्यांनी सरकारला धारेवर धरले आहे.

मुंबईत आलेल्या मराठा बांधवांना पाणी आणि अन्न मुख्यमंत्री मिळू देत नाही. कारण मुंबई मनपावर प्रशासक बसलेला असणार आहे. त्याच्यामुळे कंट्रोल संपूर्ण पणे मुख्यमंत्र्यांचा असणार आहे. पण कधी ना कधी वेळ बदलत असते. तुम्ही सेवानिवृत्त झाला तरी आयुक्तांना सुटी देणार नाही. कारण तुम्ही आमच्या मराठा पोरांचे पाणी बंद केले आहे, असा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत जनतेने मविआतील तीन्ही पक्षांना उचलून गरागरा फिरवून फेकल्यानंतर जागा गमावलेल्या विरोधकांकडून महाराष्ट्राच्या मातीशी द्रोह करण्याचे काम सुरू झाले आहे. हा महाराष्ट्र धर्म नाही.

मराठा आरक्षणाचा मुद्द्यावर देवेंद्र फडणवीस सरकार सकारात्मक मार्ग काढत असताना ते चिघळेल कसे असा प्रयत्न काही राजकीय पक्ष करीत आहेत. काल उध्दव ठाकरे, शरद पवार तसेच काँग्रेस यांच्या पक्षाच्या नेत्यांचा प्रतिक्रिया पाहाता हाच मुद्दा अधोरेखित होतो. राजकीय असूयेने पेटलेली ही मंडळी या आंदोलनातून गेलेली आपली राजकीय जमीन परत मिळविण्याच्या आशेने धडपडत असून त्यातून महाराष्ट्राच्या सामाजिक समीकरणावर आपण प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहोत, याचे भान ते विसरत आहेत.

ते पुढे म्हणाले, मराठा समाजाला १० टक्के आरक्षण महायुती सरकार असताना दिले गेले व ते सध्या लागू असून त्यातून विविध नोकऱ्यांतील भरती, प्रवेश झाले ही वस्तुस्थिती आहे. ओबीसीतूनच आरक्षण हवे असा आग्रह मनोज जरांगेचा असू शकतो व सरकार चर्चेतून मार्ग काढायला तयार आहेच, पण चार चार वेळा मुख्यमंत्री राहिलेले पवार, विश्वासघाताने का होईना पण मुख्यमंत्री राहिलेले उध्दव ठाकरे व सत्तेत अनेक वर्षे राहिलेल्या काँग्रेस नेत्यांकडून किमान संविधानिक कृतीची अपेक्षा होती, ती फोल ठरली. सुषमा अंधारे म्हणाल्या की, तहानलेल्यांना पाणी द्यावे. भुकेल्यांना अन्न द्यावे. जो जगण्याची उमेद हरवून बसला आहे. त्याला जगण्यासाठी नवी उभारी द्यावी हा माणुसकी धर्म आहे. आंदोलनातील मागण्यांची चर्चा तर लांबच पण परिसरातील खाऊ गल्ल्या छोटी टपरी वजा हॉटेल्स दंडुकेशाहीच्या जोरावर बंद करणं हा तुघलकी व्यवहार आहे. आंदोलकांनी आणलेले पीठ मीठ शिजवूनही खाऊ दिले जात नाही, असे सुषमा अंधारे म्हणाल्या.

**अमोल मिटकरी यांचा जरांगेंना पाठिंबा –** अमोल मिटकरी यांनी काल एका ट्विटद्वारे मनोज जरांगे यांच्या उपोषणाला आपला जाहीर पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे. या प्रकरणी त्यांनी या आंदोलनावर टीका करणाऱ्यांवरही निशाणा साधला आहे. एक मराठा लाख मराठा. जरांगे पाटलांच्या उपोषणाला माझा जाहीर पाठिंबा. शेतमजुरी करणारा मराठा बांधव आज हक्काची लढाई लढत असेल तर त्या लढ्याला बळ देण हे माझे कर्तव्य मी समजतो.आंदोलन संविधानीक पद्धतीने सुरू असताना त्यावर भुंकणाऱ्या झाकणझुल्या कुत्र्यांकडे दुर्लक्ष करत लढाई सुरू ठेवा.

सकल मराठा समाजाचे बांधव आपल्या न्याय्य मागण्यांसाठी शांततापूर्ण मार्गाने मुंबईत आले आहेत. या मागण्या योग्य प्रकारे पूर्ण होऊन सर्व आंदोलक सणासुदीच्या काळात सुखरूप आपल्या घरी परततील, अशी मनःपूर्वक आशा आहे. मनोज जरांगेजी हे उपोषणावर आहेत. त्यांच्या आरोग्यासाठी मी प्रार्थना करतो आणि लवकरच यावर समाधानकारक तोडगा निघावा, मराठा समाजाला न्याय मिळावा अशी अपेक्षा आहे, असे अभिनेता रितेश देशमुख म्हणाला. राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीस शासनाने दि. ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केला आहे, असे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ म्हणाले.

**उद्यापासूनच प्रमाणपत्र द्या –** शनिवार-रविवारच्या आत काही झालं नाही तर एकही मराठ्याचं लेकरूबाळ घरी राहणार नाही. महाराष्ट्रातील मराठा घरात दिसणार नाही. अजून सहा सात दिवस हातात आहे. आणखी वेळ गेली नाही. तुमचा अहवाल घ्यावा त्यांनी आणि अंमलबजावणी करावी. मराठवाड्यातील मराठा कुणबी आहे, असं जाहीर करा आणि उद्यापासूनच प्रमाणपत्र द्या.

**मागण्या मान्यच होणार नाही : पाटील –** ज्या मागण्या मान्यच होणार नाहीत अशा मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील आंदोलनाला बसले आहेत. या आंदोलनादरम्यान ज्यांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपये मदत दिली आहे. कुणबी नोंद मराठवाड्यात लवकर सापडत नाही. त्यासाठी निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती केली आहे, त्यातून ५८ लाख नोंदी सापडल्या. एक नोंद दहा दाखले देऊ शकते. या देशाचा कायदा आहे. जातीची नोंद वडिलांकडून काढावी लागते, असे वक्तव्य चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

## अमित शाह यांच्या विमानात तांत्रिक बिघाड

अडचण आल्याचे कळताच, एकनाथ शिंदे यांनी तात्काळ आपले विमान अमित शाह यांच्यासाठी उपलब्ध करून दिले. यानंतर, अमित शाह आपल्या कुटुंबासह शिंदे यांच्या विमानाने गुजरातला रवाना झाले. दरम्यान, अमित शाह यांच्या भेटीत राज्याच्या राजकारणापासून ते मराठा आरक्षणासारख्या संवेदनशील मुद्द्यांवर चर्चा झाल्याने या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या विमानात झालेल्या बिघाडामुळे एकनाथ शिंदे यांनी दाखवलेल्या तत्परतेची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे अवघ्या राज्याचे रान पेटले आहे. त्यातच मुंबईच्या दौऱ्यावर असणाऱ्या केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी भाजप सरचिटणीस विनोद तावडे यांच्याकडून या आंदोलनाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी हे आंदोलन हाताळण्यासंदर्भात काही सूचना केल्याचीही माहिती आहे. शहांनी सह्याद्री अतिथीगृहावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही या प्रकरणी चर्चा केली. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आता सरकारच्या पातळीवर वेगवान हालचाली होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मराठा आरक्षणावर शरद पवारांचे मोठे विधान

शरद पवार यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांनी स्पष्ट केले की, समाजाच्या प्रगतीसाठी आरक्षण हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. केंद्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन वेळप्रसंगी संसदेत घटनादुरुस्ती करणे आवश्यक आहे.असेही ते म्हणाले. सुप्रीम कोर्टाने ५०-५२% आरक्षण मर्यादा घालून दिली असली तरी तामिळनाडूसारख्या राज्यात ७२% आरक्षण सुप्रीम कोर्टात टिकले असल्याचे उदाहरण देत पवार यांनी मराठा आरक्षणासाठी ठोस पावले उचलण्याचे आवाहन केले. ठाण्यातील दौऱ्यात पत्रकारांनी मराठा आरक्षणावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज ठाकरे म्हणाले, मनोज जरांगे परत का आले, हे एकनाथ शिंदेंनाच विचारा. मागच्या वेळी जेव्हा ते नवी मुंबईत गेले होते, तेव्हा प्रश्न त्यांनीच सोडवल्याचे सांगितले होतं. मग आता पुन्हा आंदोलन का उभं राहिलं?'' असं म्हणत त्यांनी शिंदेंनाच अप्रत्यक्षपणे जबाबदार धरलं. सविस्तर वाचा

## प्रवरा रुरल कॉलेज ऑफ फार्मसीत क्रीडा दिनाचे जल्लोषमय आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**प्रवरानगर :** प्रवरा रुरल कॉलेज ऑफ फार्मसी, प्रवरानगर (लोणी) येथे क्रीडा दिन उत्साहपूर्ण आणि जल्लोषमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध खेळांचे थरारक सामने रंगले, तर विद्यार्थ्यांनी आपल्या क्रीडाप्रतिभेचे उत्कृष्ट प्रदर्शन करून सर्वांचे मन जिंकले. या दिवशी हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त विशेष आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक श्री. हरिदास हजारे सर तसेच डॉ. संजय भवर सर यांनी विद्यार्थ्यांना क्रीडाविषयक मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की ''खेळ हे केवळ मनोरंजनासाठी नसतात, तर ते आयुष्य घडवणारे एक जीवनमंत्र आहेत. खेळांमुळे शरीराची तंदुरुस्ती, चपळता आणि सहनशक्ती वाढते. त्याचबरोबर मानसिक स्वास्थ्य, एकाग्रता, संयम आणि निर्णयक्षमता विकसित होते. संघभावना, शिस्त, वेळेचे नियोजन, नेतृत्वगुण आणि पराभव पचवण्याची ताकद ही सगळी मूल्ये खेळांमधून शिकायला मिळतात. भविष्यातील व्यावसायिक आयुष्यात यशस्वी होण्यासाठी हीच मूल्ये फार महत्त्वाची ठरतात.''

त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांचा उत्साह दुपटीने वाढला. अनेक विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाला जीवनात अंगीकारण्याचा संकल्पही केला. यावेळी डॉ. सुहास सिधेश्वर, डॉ. सोमेश्वर मनकर, डॉ. संतोष दिघे, डॉ. दत्तप्रसाद विखे, डॉ. सागर मगर, श्री. अमोल दिघे, श्री. अनिल आहेर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रम अधिकच प्रेरणादायी ठरला. क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, खेळातील जिद्द व शिस्तीचे दर्शन घडले. विविध स्पर्धांमध्ये झालेली मैत्रीपूर्ण पण उत्साहवर्धक चुरस विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात भर घालणारी ठरली. या अविस्मरणीय आयोजनाने क्रीडा दिन सर्वांच्या मनावर अमीट ठसा उमटवून गेला.

# जिल्ह्यातील १७ मंडळात धुव्वाधार पाऊस

## शेवगाव, पाथर्डीच्या मंडलामध्ये अतिवृष्टी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांना वाकुल्या दाखवणाऱ्या पावसाने गुरूवारी जिल्ह्याच्या विविध भागात दमदार हजेरी लावली आहे. यात विशेष करून नगर, श्रीगोंदा, पारनेर, जामखेड, नेवासा, शेवगाव व पाथर्डी या तालुक्याचा समावेश आहे. दरम्यान, शेवगाव व पाथर्डी या दोन तालुक्यातील अतिवृष्टीच झाली असून १५ मंडलामध्ये ६५ मिलीमीटरपेक्षाही अधिक पाऊस झाला आहे. या दोन तालुक्यासह नगर, नेवासा या दोन तालुक्यात समाधानकारक पाऊस झाला आहे.

उत्तर नगर जिल्ह्यात समाधान पावसाची अद्यापही प्रतिक्षा आहे. गुरुवारी झालेल्या या पावसामुळे खरीप हंगामातील विविध पिकांना जीवदान मिळाले असून शेतकऱ्यांच्या आशा



पल्लवीत झाल्या आहेत. दुसरीकडे सध्या विविध पिके फुलोरा व बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहेत. मान्सून पूर्व पावसाच्या तडाख्यानंतर जून आणि जुलै महिन्यांत पावसाने ताणले होते. त्यानंतर ऑगस्ट महिन्यांत परतीचा पाऊसची प्रतीक्षा लागली. जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यांत आतापर्यंत १३५.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. जून महिन्यात सरासरी १०८.२ मिलीमीटर पावसाची नोंद होते. यंदा ८०.२ मिलीमीटर पाऊस झाला. तर जुलै महिन्यात ९७.५ सरासरी पावसाची नोंद होते. पण यंदा ६१ मिलीमीटर पाऊस झाला आहे. त्यामुळे समाधानकारक पावसाची शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे. गुरुवार नगर, शेवगाव व पाथर्डी या तीन तालुक्यातील १७ मंडलमध्ये अतिवृष्टी झाली आहे. शेवगाव व पाथर्डी या दोन तालुक्यात सर्व मंडलामध्ये अतिवष्टी झाली आहे.

### अतिवृष्टी झालेले मंडल

नगर-नागापूर मंडलात ६६.८, जेऊर ६५.८, शेवगाव ७४.३, बोधेगाव ७९, चापडगाव ७९, ढोरजळगाव ६८, एरंडगाव ७०.८, दहिगावने ७०.८, मुंगी ७५.३. पाथर्डी ६९.३, माणिकदौंडी ६९.३, टाकळी ७१.५, कोरडगाव ७०.८, मिरी ६८.५, तिसगाव ६५.३, खरवंडी ७१.५, अकोले ७०.८.

खरीप हंगामातील पिकांना ऑगस्टमध्ये झालेल्या पावसामुळे जीवदान मिळाले आहे. खरीपाची १००.७४ टक्के पेरणी झाली आहे. ७ लाख १६ हजार २०८ हेक्टर क्षेत्राचे नियोजन करण्यात आले असून ७ लाख २१ हजार ४७९.८१ हेक्टर क्षेत्रावर पेरण्या झाल्या आहेत. सध्या पिकांची परिस्थिती समाधानकारक आहे. फुलोरा व बोंडे लागण्याच्या अवस्थेत पिके आहेत. मुग व उडीद पिकाची ८० ते ८५ टक्के काढणी झाली आहे. बाजरी पिक फुलोरा व पक्कतेच्या अवस्थेत आहे. कापुस वाढीच्या पाते फुटणाच्या व बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहे. सोयाबीन वाढ व शेंगा लागण्याच्या अवस्थेत आहे. त्यामुळे खरीप पिक स्थिती चांगली असली तरी अजूनही पावसाची प्रतीक्षा आहे.

# पाच ठिकाणी चोरीचा प्रयत्न फसला



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील एकलहरे, आठवाडी व उक्कलगाव शिवारात एकाच रात्री पाच ठिकाणी घरफोडीची घटना घडल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असून चार चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत.

येथील शेतकरी नसीर सलीम शेख यांच्या घरात गुरुवार दि. २८ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला. मात्र, घरातील लोक वेळेवर जागे झाल्याने चोरट्यांनी पळ काढला. यावेळी हे चोरटे शेख यांच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले. येथे काहीच मुद्देमाल न मिळाल्याने चोरट्यांनी उक्कलगावकडे आपला मोर्चा वळवत उक्कलगाव-खंडाळा रोडवरील राजेंद्र पोपट थोरात यांच्या शेडमधील दुचाकीचे लॉक तोडून चोरट्यांनी दुचाकी लॉक लंपास केली. तसेच घराच्या मुख्य दरवाज्याचा कटरच्या सहाय्याने तोडून घरात प्रवेश करून कपाटातील कागदपत्रांची पिशवी घेऊन पळ काढत असतांना राजेंद्र थोरात यांच्या पत्नीला जाग आली. घरात कोणीतरी आले असल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी आरडा-ओरडा केला. तोपर्यंत चोरटे पळून गेले. यावेळी येथील वस्तीवरील ग्रामस्थ जागे झाल्याने चोरट्यांनी तिनशे नाला परिसरात थोरातयांची दुचाकी खड्ड्यात टाकून पलायन केले.

# कोपरगाव मतदारसंघ उपाध्यक्षपदी ॲड. लहारे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या कोपरगाव मतदारसघाच्या तालुका उपाध्यक्षपदी ॲड. अतुल लहारे यांची निवड करण्यात आली आहे.

माजी आ. स्नेहलता बिपीन कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. कोल्हे परिवाराचे खंदे समर्थक ॲड. अतुल लहारे यांच्या नावाची घोषणा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष सतिष देवकर यांनी केली.

या निवडीनंतर संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, युवा नेते विवेक कोल्हे आणि भाजप राज्य परिषद सदस्या स्नेहलतान कोल्हे यांनी अभिनंदन केले.

ॲड. अतुल लहारे म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या ध्येय धोरणानुसार शासनाच्या विविध योजना व उपक्रम तळागाळातील शेतकरी, मजूर, विद्यार्थी व सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम प्रामाणिकपणे आपण या माध्यमातून करणार आहोत. तसेच माझ्यासारख्या सर्वसामान्य बुथ प्रमुखाला तालुका पातळीवर काम करण्याची संधी दिली आहे.

# जळगावातील रेल्वे बोगद्यात पाणी

## ग्रामस्थांचे मोठे हाल; वाहतूक विस्कळीत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा** : पुणतांबा रेल्वे जंक्शनच्या जवळ तीन किमीवर असलेल्या जळगाव चौकी येथील भुयारी पुलात पावसाचे पाणी साचत असल्यामुळे गोंडेगाव जळगाव वाहतूक विस्कळीत होत आहे.

पुलाखाली जमलेले पाणी उपसण्यासाठी बऱ्याच वेळा ट्रॅक्टरचा वापर केला जातो, तरीसुद्धा थोडेफार पाणी शिल्लक राहते. विशेषतः गोदावरी उजव्या कालव्याला पाणी आल्यानंतर येथील १८ व १९ या पोटचाऱ्यांना पाणी सोडले तर भुयारी पुलाखाली पाणी येण्याचे प्रमाण वाढते. त्यातच मुसळधार पाऊस पडला तर पाण्याची आवक जास्त होते. त्यामुळे भुयारी पुलामार्गे होणारी वाहतूक आणखी विस्कळीत होते.

जळगाव चौकीजवळच भुयारी मार्ग असूनही वाहतूक विस्कळीत होते. तर पुणतांबा येथील नवीन फाटक बंद झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागतात. पुणतांबा रेल्वे स्टेशनला जंक्शनचा दर्जा मिळाल्यापासून पुणतांबेकरांच्या अडचणी अधिक वाढल्या आहेत. त्यामुळे रेल्वे जंक्शन असूनही पुणतांबेकरांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, ज्यामुळे असून अडचण, नसून खोळंबा अशी द्विधा मनस्थिति निर्माण झाली आहे.

# दहावीची परीक्षा फेब्रुवारी महिन्यात

## पहिली ते नववीच्या परीक्षा एप्रिल अखेरीस



**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : गतवर्षी इयत्ता पहिली ते नववीच्या परीक्षा आणि संकलित मूल्यमापन चाचणीचे वेळापत्रक आयत्या वेळी बदलल्यामुळे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेला (एससीईआरटी) टीकेचे धनी व्हावे लागले होते.

यातून धडा घेत एससीईआरटीने यंदा सावध पवित्रा घेत इयत्ता पहिली ते दहावी परीक्षांचे वेळा-पत्रक जाहीर केले आहे. दहा-वीची परीक्षा फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यात, तर इयत्ता पहिली ते नववीच्या परीक्षा गत वर्षीप्रमाणे एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात घेण्यात येणार आहेत.

यापूर्वी पहिली ते नववी परी-क्षा आयोजित करण्याचे अधिकार प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापकांना होते. त्यामुळे वार्षिक परी-क्षेचे नियोजनही मुख्याध्यापक शाळांच्या वेळापत्रकानुसार करत होते. यामुळे शैक्षणिक दिवस वाया जात असल्याचे कारण देत एससीईआरटीने गेल्या वर्षी राज्यातील सर्व शाळांच्या वार्षिक परीक्षा तसेच संकलित मूल्यमापन चाचणी म्हणजेच पॅटचे वेळापत्रक जाहीर केले. या निर्णयावर पालक, शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षणसंस्था या सर्व पातळ्यांवर टीका होऊनही एससीईआरटीने आपला निर्णय पुढे रेटला.

राज्यभरातील शाळांमधील इयत्ता पहिली ते नववीच्या परीक्षा आणि पॅट चाचणी एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यातच घेण्याचेही या वेळापत्रकानुसार निश्चित करण्यात आले आहे. परिणामी गेल्या शैक्षणिक वर्षात घिसडघाईने घेतलेला परीक्षांबाबतचा निर्णय यंदा शाळांना वेळेतच कळवण्यात आला आहे. त्यामुळे यंदा शैक्षणिक वर्षातील प्रत्यक्ष अध्ययनाचे दिवस एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत सुरू राहणार असून शिक्षकांना यंदाही तातडीने उत्तरपत्रिका तपासून निकाल जाहीर करावा लागणार आहे.

# आठवड्यातील एक दिवस कोरडा पाळा

## वैद्यकीय अधिकारी घुले : हातगाव येथील केंद्रशाळेत मार्गदर्शन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : पावसाळा ऋतू असल्याने दुषित पाण्यामुळे होणारे आजार व किटकजन्य आजार टाळण्यासाठी प्रत्येकाने काळजी घ्यावी. हिवताप, डेंगुताप, मलेरिया, चिकनगुण्या, गोचीडताप हे आजार टाळण्यासाठी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा, असे आवाहन हातगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी अरविंद घुले यांनी केले.

हातगाव येथील जिल्हा परिषदेच्या केंद्रशाळेत विद्यार्थ्यांना 'पावसाळ्यातील आजार व उपाययोजना' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. घुले बोलत होते.

मुख्याध्यापक गणेश पुरुषोत्तम, आरोग्य सेवकमारुती मिसाळ उपस्थित होते. डॉ. घुले म्हणाले की, पावसाळ्यात टाक्या, भांडी यातील पाणी झाकून ठेवावे. सात दिवसानंतर टाक्या, भांड्यातील पाणी टाकून देऊन कोरडा दिवस पाळावा. डबक्यात, टाक्यात, नारळाच्या कवट्यात, टायरमध्ये जास्त दिवस पाणी राहिले तर त्यात अळ्या तयार होऊन डासांची निर्मिती होते. डास चावल्याने हिवताप, डेंगुताप, मलेरिया, चिकनगुण्या, गोचीडताप या आजारांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे पाणी उकळून ते थंड करून प्यावे.

यावेळी ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब वाघुमबरे, एकनाथ घुगे, संजय भालेकर, अंबादास कांबळे, संजीवन शेलार, हरिभाऊ सरदार आदी शिक्षक उपस्थित होते.

# गुणवंत कलाकार घडाविण्यात प्रवरेचा पुढाकार

## शालिनीताई विखे पाटील; प्रवरेत सांस्कृतिक महोत्सव



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : प्रवरा सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत असतानाच प्रवरेच्या माध्यमातून गुणवंत कलाकार घडावेत, यासाठी प्रवरा कायमच पुढाकार घेत असते. प्रवरेच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षणासोबतच क्रीडा, विविध कला आणि संस्कृतीला व्यासपीठ देण्याचा प्रयत्न विविध माध्यमातून होत असतो. यांचा विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन शिक्षणासोबतच आपल्या आवडीनिवडी जपाव्यात, असे प्रतिपादन शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

प्रवरानगर येथील डॉ. धनंजय गाडगीळ सभागृहात पद्मश्री विखे पाटील कारखाना आणि प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, लोणी, प्रवरा रिक्रिएशन क्लब तसेच क्लबचे गणेशोत्सव मंडळ यांच्या वतीने आयोजित प्रवरा सांस्कृतिक महोत्सव २०२५ चा शुभारंभ झाला. यावेळी विखे कारखान्याचे उपाध्यक्ष सोपानराव शिरसाठ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, कार्यकारी संचालक महेश कोनापुरे, दादासाहेब घोगरे, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, शिक्षण संचालिका लीलावती सरोदे, डॉ. महेश खर्डे उपस्थित होते.

### टीमवर्कमुळे उत्कृष्ट काम

डॉ. सुस्मिता विखे पाटील म्हणाल्या, प्रवरेत सहकारांतून समृध्दीकडे, शिक्षणांतून विकासाकडे नेहमीच विविध उपक्रम सुरू असतात. टीमवर्कमुळे प्रवरेत हे काम होत आहे. ग्रामीण विद्यार्थी हा सर्वगुणसंपन्न ठरावा यासाठीच हा उपक्रम सुरू असल्याचे डॉ. विखे पाटील म्हणाल्या.

# वडाळा महादेव परिसरात बिबट्या



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्रीरामपूर ते वडाळा महादेव गावाला जोडणारा रस्ता तसेच पिण्याचे पाण्याचे तलाव लगत असणाऱ्या शेतामध्ये अनेक दिवसांपासून नर मादी बिबट्याचे वास्तव्य असून सध्या त्यांना पिल्ले झाल्याचे ग्रामस्थांनी माहिती दिली.

या ठिकाणी बिबट्यास लपण्यासाठी सुरक्षित व मोठी जागा उपलब्ध असून सध्या या ठिकाणी बिबट्या वास्तव करून आहे. परिसरात वडाळा महादेव तसेच वाडी वस्ती यांना पाणीपुरवठा करणारा तलाव असून रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय याच परिसरात आहे. सध्या ग्रामस्थांमधून तसेच पालक वर्गातून मोठे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सदर विभागाने नर, मादी बिबट्यास पिल्लासह जेरबंद करून अन्य ठिकाणी हलवण्यास यावे, अशी मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे. काही दिवसांपूर्वी येथील श्री पवार यांच्यावर शेतामध्ये स्प्रिंकलर चे पाईप बदलत असताना पाठीमागून हल्ला केला होता तसेच गावठाण परिसरात पिंपळाच्या झाडावर बिबट्याने मुक्काम ठोकला परंतु झाडाखाली अनेक गावातील कुत्र्यांनी ठाण मांडल्याने सदर बिबट्यास सकाळपर्यंत झाडावर बसावे लागले. अखेर ग्रामस्थांच्या लक्षात आल्याने सदर बिबट्याची सुटका करण्यात आली.

# वारकरी सांप्रदायाची भक्तीस्थान अढळ : मीराबाई मिरीकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगांव** : भक्ती चळवळीची पताका प्रत्येक संतांनी आपापल्या खांद्यावर घेऊन वेगवेगळे तत्वज्ञान समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला असला तरी महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाने भक्ती चळवळीतील आपले स्थान आजतागायत अढळ ठेवलेले आहे. या सांप्रदायातूनच सामाजिक आणि आध्यात्मिक समता, मानवता, सदाचाराची शिकवण माणसाला मिळाली असल्याचे विचार ह.भ.प. मीराबाई मिरीकर यांनी संवत्सर येथे आयोजित किर्तनाद्वारे व्यक्त केली.

कोपरगाव तालुक्यातील संवत्सर येथे ऋषीपंचमीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या किर्तनातून मीराबाई मिरीकर



भाविक श्रोत्यांना मार्गदर्शन करताना बोलत होत्या.

गोदावरी नदीमध्ये ऋषीपंचमीनिमित्त लाखो महिला भाविकांनी स्नानांची पर्वणी साधली. त्यानंतर मीराबाई मिरीकर यांचे शनी महाराज मंदिराच्या प्रांगणात किर्तन आयोजित करण्यात आले होते. प्रारंभी गोदावरी खोरे दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे पाटील यांनी ग्रामस्थांच्या वतीने मीराबाईंचा सत्कार करून उपस्थितांचे स्वागत केले. कीर्तनापूर्वी जिल्हा परिषद शाळेच्या आवारात मीराबाईंच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

समाधानकारक पावसामुळे यंदा नदीला दुथडी भरुन पाणी वाहत असल्यामुळे संपूर्ण गोदाकाठ भक्तीमय झालेला होता. महाप्रसादाने या धार्मिक सोहळ्याची सांगता झाली.

### वारकरी सांप्रदायाने भक्तीला स्थान दिले

संतांनी आपल्या आचार विचारातून मानवी मूल्यांचा मांडलेला विचार आदर्शवत असल्याने लोकजीवनावर त्या विचारांचे चांगले संस्कार झालेले आहेत. 'जनी जनार्दन' या सहज विचारातून सामाजिक प्रगतीचा देखील संतांनी विचार केलेला आहे. वारकरी सांप्रदायाने ज्ञानाचे महत्व मान्य करून भक्तीला अग्रस्थान दिलेले आहे. त्यासाठी नामसंकीर्तनासारखे अतिशय सोपे साधन लोकांना उपलब्ध करून दिले असल्याचे हभप मीराबाई मिरीकर यांनी सांगितले.

# ग्रामसभेत शेतकरी व गोरक्षक आमने- सामने

## तालुक्यातील उक्कलगावमधील प्रकार; काहीकाळ तणाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील उक्कलगाव येथील ग्रामसभेत ऐनवेळीस आलेल्या गोरक्षकांनी केलेल्या मारहाणीच्या विषयावरून प्रचंड गोंधळ उडाला. त्यामुळे सुरळीत सुरू असलेल्या ग्रामसभेत शेतकरी व गोरक्षकांत बाचाबाची झाली. यामुळे काहीकाळ तणाव निर्माण झाला होता.

संरपच रविना शिंदे यांच्या सुचनेनूसार सभेच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच नितीन थोरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. मागील सभेचे इतिवृत्त वाचन ग्रामविकास अधिकारी जी. एस. पवार यांनी केले.



जलजीवनचे नवीन प्रस्ताव, स्वच्छता, आरोग्य, कृषी, महसूल, कर आकारणी, दारुबंदी, गाळा भाडे वसूली, ई-पीक पाहणी, ॲग्री स्टॉग आदींसह अन्य विषयावर साधकबाधक चर्चा करण्यात आली. ज्या ग्रामस्थांची घरपट्टी व नळपट्टी थकबाकी असल्याने त्यांना नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

यावेळी तलाठी हिमालय डमाळे, कृषी सहाय्यक विशाल घुगे, अँड. पुरुषोत्तम थोरात, रविंद्र थोरात, सदस्य शरद थोरात, आदीनाथ जगधने, दिलीप थोरात, सदस्या उर्मिला थोरात, अनिल थोरात, सोमनाथ मोरे, बबन रजपूत, रमेश धनवटे, सागर चव्हाण, किशोर थोरात, रमेश थोरात, प्रसाद थोरात, महेश थोरात, रावसाहेब तांबे, विलास थोरात आर्दीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

### तंटामुक्त अध्यक्षपदावरून गोंधळ

तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी ज्ञानदेव वामन थोरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली मात्र त्यांच्या नावाला युवराज थोरात यांनी विरोध केला. या विरोधामुळे सभेचे अध्यक्ष नितीन थोरात यांनी पंधरा दिवसांत विशेष ग्रामसभा बोलावून तसेच दवंडी देऊन मागील तंटामुक्ती अध्यक्षाला रितसर नोटीसा बजविण्यात येईल, असे सांगितले. त्यांनतर सभेत काहीकाळ सुरु असलेला गोंधळ निवळला.

# आदर्श संगमनेर तालुक्याचा लौकिक देशात वाढवा

## माजीमंत्री बाळासाहेब थोरात; महावादन सोहळ्यातून स्थानिक कलाकारांचा गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर शहरातील राजकीय सुसंस्कृतपणा, आदर्शवत सहकार,शिक्षण,कृषी, ग्रामीण विकास यामधील काम याचबरोबर सांस्कृतिक विविधता ही जपण्याचे काम तरुणांचे असून आदर्श संगमनेर तालुक्याचा लौकिक संपूर्ण देशामध्ये वाढवा, असे आवाहन काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

संगमनेर बस स्थानक येथे आय लव संगमनेरच्या वतीने पारंपारिक वादकांचा महामेळावा व भव्य महावादन संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. यामध्ये तांडव, रुद्र, एकलव्य, छावा, हिंदू राजा, या ढोल पथकातील ४०० कलाकारांनी सहभाग घेतला. यावेळी काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आयोजक आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्री थोरात, गिरीश मालपाणी, दिलीपराव पुंड, डॉ. मैथिली तांबे, नितीन अभंग यांच्यासह आय लव संगमनेर चळवळीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गणेश उत्सवानिमित्त संगमनेर बस स्थानक परिसरामध्ये आय लव संगमनेरच्या वतीने भव्य विद्युत रोषणाई मध्ये हा महामेळा संपन्न झाला. यावेळी पारंपारिक ढोल ताशांचा देशभर गजर करणारे ४०० युवक व युवतींनी व इतर दोनशे कलाकारांनी सहभाग घेतला. मराठी व हिंदी गीतांच्या विविध चालींवर ढोल ताशांच्या गरजेने संगमनेर शहर दुमदुमले. यावेळी आकर्षक विद्युत रोषणाई. प्रेक्षक गॅलरी, मराठी वाद्य आणि धार्मिक वातावरण याचबरोबर गणेशाचा जय जय कार यामुळे सर्व वातावरण भक्तीमय झाले होते.



यावेळी माजी मंत्री थोरात म्हणाले की, संगमनेर तालुक्याला विकासाची मोठी परंपरा आहे. सर्वधर्मसमभाव, बंधुभाव असलेले हे आदर्श व सुंदर शांततामय वातावरण असलेले शहर आहे. हा लौकिक आपल्या सर्वांना जपायचं आहे. सांस्कृतिक क्षेत्रामध्ये संगमनेरचे मोठे नाव असून आय लव संगमनेर चळवळीच्या माध्यमातून विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना मोठे व्यासपीठ आ. तांबे यांनी उपलब्ध करून दिले आहे.

> संगमनेरमध्ये देशात नावाजलेले ढोल ताशा पथक आहेत. काश्मीर ते कन्याकुमारी अशा विविध राज्यांमध्ये ते विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमधून वादन करत असतात. या सर्वांना एकत्र करून हा भव्य महावादन मेळावा होत आहे. हे सर्व संगमनेरकर एकरूप होऊन आज गणेश उत्सवानिमित्त गणेशाला महावंदन करत आहे. संगमनेरकर विविध जाती धर्माचे सर्व लोक एकत्र येऊन सर्वांचे सण आनंदाने साजरा करतात हे तालुक्याचे वैशिष्ट्य आहे.
>
> **– सत्यजित तांबे, आमदार**

आ. तांबे म्हणाले कि, संगमनेरचे गुणी कलावंत देशभरामध्ये विविध ठिकाणी आपली कला साजरी करतात. ढोल ताशा पथकातील या सर्व कलाकारांना एकत्र घेऊन आजचा हा महावादन सोहळा होत आहे. पारंपारिक वाद्यांचा हा सोहळा संस्मरणीय असून यामध्ये युवक व युवतींचा मोठा सहभाग आहे. सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन सर्वांचे सन साजरी करतात एकरूपता ही संगमनेर तालुक्याचे वैशिष्ट्य आहे. तर मा. आ. डॉ. तांबे म्हणाले की, संगमनेरची एक समृद्ध परंपरा आहे. सांस्कृतिक वैभव लागलेल्या संगमनेरच्या या भूमीने देशाला दिशा दिली आहे. यावेळी गिरीश मालपाणी, डॉ. जयश्री थोरात यांनीही सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी संगमनेर तालुक्यातील सुमारे १५०००० युवकांची मोठी उपस्थिती हे या महा वादन व महामेळाव्याचे वैशिष्ट्य ठरले.

# वडाळा महादेवच्या सरपंचपदी सचिन पवार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी सचिन पवार यांची निवड झाली.

ग्रामपंचायत सरपंच चंद्रकला पवार यांचा राजीनामा प्राप्त झाल्याने येथील ग्रामपंचायत सदस्य सचिन बापूसाहेब पवार यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. यानुसार मंडल अधिकारी रोहिणी आघाव यांनी कामकाज पाहिले. यावेळी त्यांना कामगार तलाठी चव्हाण तसेच ग्रामविकास अधिकारी नंदकिशोर शेळके यांनी मदत केली.

याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य सर्व पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पवार यांनी २०१० ग्रामपंचायत सरपंच म्हणून कामकाज पाहिले. तर ३ पंचवार्षिक ग्र. पं. सदस्य म्हणुन कामकाज पाहात आहे. सर्वसामान्य नागरीकांना



मदत कार्य केल्याने गोरगरीब जनता सहकार्य करत असल्याचे मत सरपंच सचिन पवार यांनी व्यक्त केले.

श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक नितीन देशमुख, पोलीस उपनिरीक्षक दादाभाई मगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संतोष परदेशी, पो. कॉ. अंबादास आंधळे, प्रवीण कांबळे, राजेंद्र देसाई, चंद्रकांत मोरकर, राहुल देशमुख यांनी चोख बंदोबस्त बजावला.

# प्रवरा पब्लिक स्कूलमध्ये जलतरण स्पर्धा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा पब्लिक स्कूल प्रवरानगर येथे मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडादिन म्हणून साजरी करण्यात आली. या दिनाच्या औचित्य साधून शाळेमध्ये वार्षिक जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या जलतरण स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे माजी विद्यार्थी आणि प्रवरा मेडिकल ट्रस्टचे भूलतज्ञ डॉ. तुषार भवर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे यांनी प्रमुख पाहुण्यांचा यथोचित परिचय करून दिला.

> **विद्यार्थीनी सर्वोत्कृष्ट जलतरणपटूने सन्मानित**
>
> जलतरण स्पर्धेत १२, १४, १७ आणि १९ अशा चार वयोगटातून मुले व मुली अशा स्वतंत्र गटातून स्पर्धा घेण्यात आली. अतिशय रोमांचक झालेल्या या स्पर्धेत शिवाजी सदनने प्रथम क्रमांक पटकावला. तानाजी सदन द्वितीय, नेताजी सदन तृतीय, तर सरदार पटेल सदन चतुर्थस्थानी राहिले. १४ वर्षे वयोगटात- उमेर शेख, १७ वर्ष वयोगटात- साईराम जाधव आणि १९ वर्ष वयोगटात- अर्कम शेख यांनी चॅम्पियनशिप पटकावली. तर मुली गटातून कु अरिका शेख या विद्यार्थीनीला सर्वोत्कृष्ट जलतरणपटू म्हणून सन्मानित करण्यात आले.

जलतरण स्पर्धेच्या सुरुवातीला शाळेच्या विद्यार्थ्यांकडून जलतरणाच्या फ्री स्टाइल, ब्रेस्ट स्ट्रोक, बॅक स्ट्रोक व बटरफ्लाय अशा विविध प्रकाराची प्रात्यक्षिके




सादर करण्यात आली. या स्पर्धेमध्ये शाळेतील तानाजी, शिवाजी व सरदार पटेल या चारही सदनांनी सहभाग नोंदवला.

याप्रसंगी शाळेचे प्राचार्य डॉ. बी. बी. अंबाडे, उपप्राचार्य के. टी. अडसूळ, पर्यवेक्षिका एम. एस. जगधने, शुभांगी रत्नपारखी हे उपस्थित होते. स्पर्धेच्या नियोजनात क्रीडा संचालक रमेश दळे आणि जलतरण प्रशिक्षिका योगिता तनपुरे यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेचे समालोचन सिमा क्षिरसागर आणि संतोष ढगे यांनी केले. तर आभार योगिता तनपुरे यांनी केले.

# टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे कार्य कौतुकास्पद

## डॉ. सुनिता पारे : टेके पाटील ट्रस्टच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** वारी गावातील राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे कार्य हे सामाजिक दातृत्व जपणारे आहे. या कार्यातून आजवर गावासह परिसरात असंख्य उपक्रम राबवलेले आहेत. त्यातूनच विद्यार्थ्यांच्या मोफत नेत्र तपासणीचा, मोफत चष्मे वाटप व व तिरळेपणाची शस्त्रक्रिया मोफत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या शिबिरातून शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. त्यामुळे ट्रस्टचे हे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवउद्गार सोमय्या विद्यामंदिर व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य डॉ.



सुनिता पारे यांनी काढले.

कोपरगाव तालुक्यातील राहुल (दादा) मधुकरराव टेके पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचलित मोफत मदत सेवा केंद्राच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त टेके पाटील ट्रस्ट व तुलसी आय हॉस्पिटल, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने साकरवाडी येथील सोमय्या विद्या मंदिर व उच्च माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, साकरवाडी व शिरसाठ वस्ती शाळा, वारी या तीन शाळेतील जवळपास १००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची शिबिराअंतर्गत मोफत नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप व तिरळेपणाची शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे.

त्याची सुरुवात दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी सोमय्या विद्यामंदिर साकरवाडी येथून करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून प्राचार्य डॉ. पारे बोलत होत्या.

याप्रसंगी रोहित टेके, डॉ. सर्जेराव टेके महाराज, डॉ. विनायक टेके महाराज, संजय गडकर, संजय राऊत, अशोक मोरे, योगेश झाल्टे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार गणेश गायकवाड यांनी मानले. आयोजित शिबिरात डॉ. हर्षल पाठक व कैलास भड यांनी विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी केली.

याप्रसंगी राजेश खटावकर, सुरज टेके, स्वप्निल टेके, आकाश निळे, अविनाश दुशिंग, विकास कुऱ्हाडे, सनी जाधव, यश मैराळ यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओढ्याच्या पुरात दुचाकीस्वार गेला वाहून

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** मोहटादेवी परिसरात जोरदार पाऊस झाल्याने धायतडकवाडी गावाच्या हद्दीत असलेल्या बोरीच्या ओढ्यात तालुक्यातील तिनखडी येथील पांडुरंग निवृत्ती आंधळे (वय ७२) हे आपल्या दुचाकीवरून गावाकडे जात असतांना ओढ्यात वाहून गेल्याची घटना शुक्रवारी सायंकाळी घडली.

दरम्यान, प्रशासनाकडून सबंधित इसमाचा शोध सुरू असून चालू असलेल्या पावसामुळे व अंधारामुळे शोधकार्यात अडथळे निर्माण होत आहे. तालुक्यातील तिनखडी येथील पांडुरंग आंधळे हे काल कामानिमित्त पाथर्डी येथे आले होते. त्यानंतर ते दुचाकी वरून गावाकडे जाण्यासाठी सायंकाळी सहाच्या दरम्यान निघाले होते.

याचवेळी मोहटादेवी परिसरात चारच्या सुमारास जोरदार पाऊस झाल्याने मोहटादेवी कमनीच्या पुढे असलेल्या धायतडकवाडी हद्दीतील बोरीच्या ओढ्याला मोठा पूर आला होता. यावेळी जवळपास कमरे एवढे पाणी त्या ओढ्यातून वाहत होते. तरीही पांडुरंग आंधळे यांनी दुचाकीवरून



ओढा ओलांडण्याचे साहस करत असतांना पाण्याच्या जोरदार प्रवाहाने ते ओढ्यात दुचाकीसह वाहून गेले.

यावेळी घटनास्थळी असलेल्या नागरिकांनी तत्काळ प्रशासनाला याबाबत कळवले. त्यानंतर तातडीने तहसीलदार उध्दव नाईक, पोलिस निरीक्षक विलास पुजारी यासह कर्मचाऱ्यांनी धाव घेत आंधळे यांचे शोधकार्य चालू केले.

# मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला हार घालून गांधीगिरी

## श्रीगोंदा नगरपरिषदेच्या प्रशासनाचा संभाजी ब्रिगेडकडून निषेध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** नगरपरिषदेत संभाजी ब्रिगेड पक्षाचे पदाधिकारी गेले असता मुख्याधिकारी भगत यांनी दालन सोडले. तब्बल तीन तास आंदोलन सुरू असल्यानंतर त्यांनी चर्चेसाठी बोलावले. मात्र कार्यकर्त्यांनी चर्चा लाईव्ह करा अशी मागणी केल्यावर त्यांनी चर्चा टाळली. यामुळे संतप्त कार्यकर्त्यांनी मुख्याधिकारी यांच्या खुर्चीला हार अर्पण करून निषेध व्यक्त केला. तसेच कामचुकार मुख्याधिकारी यांना प्रशासक पदावरून हटविण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेड पक्षाचे तालुकाध्यक्ष शामभाऊ जरे यांनी दिली.

नगरपरिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन, रस्त्यांवरील खड्डे, स्वच्छता, मंडईसाठी जागा, पार्किंग व्यवस्था, निकृष्ट दर्जाचे स्पीडब्रेकर, भटकी जनावरे, अतिक्रमण, सीसीटीव्ही कॅमेरे आदी विविध समस्या तातडीने सोडविण्याबाबत संभाजी ब्रिगेड पक्षाकडून दोनवेळा निवेदन देण्यात आले होते.

तथापि, नगरपरिषद प्रशासनाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी तीव्र




आंदोलन छेडण्याचा इशारा संभाजी ब्रिगेड पक्षाने दिला होता.

या आंदोलनासाठी मुख्य सचिव सुयोग धस, दिलीप लबडे, प्रफुल्ल जगताप, संदिप जगताप, रवींद्र महंदुळे, घनश्याम काळे, सद्दाम शेख, उत्तम घोगरे, पांडुरंग खोरे, कृष्णा जगताप, प्रतीक साळवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# चांगल्या आरोग्यासाठी आहार महत्त्वपूर्ण : जंजिरे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** प्रत्येक व्यक्तीची जीवनशैली मोठ्या प्रमाणामध्ये बदललेली पहावयास मिळत आहे. आज प्रत्येक जण धावत आहे. यामुळे आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुमचा आहार यासाठी महत्त्वपूर्ण आहे. चांगला आहार असावा. त्यामध्ये चांगले आणि शुद्ध तेल असावे. आज बाजारामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये खाद्यपदार्थात भेसळ आपल्याला पहावयास मिळते. आणि यामुळेच गंभीर



आजार निर्माण होत आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक भाऊसाहेब जंजिरे यांनी केले.

कर्जत येथे प्रकाश ऑइल इंडस्ट्रीज या कोल्ड प्रेस नैसर्गिक पद्धतीच्या तेलाच्या दालनाचा भव्य शुभारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी उद्योजक भाऊसाहेब जंजिरे, बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर, अशोक खेडकर, नामदेव राऊत, प्रवीण घुले, बाळासाहेब साळुंखे, अंबादास पिसाळ, काकासाहेब धांडे, अनिल गदाद, बाप्पासाहेब पाटील, अनिल धांडे, महादेव सुरवसे, सीईओ राम काळे यांसह आदी उपस्थित होते.

> कर्जत सारख्या ग्रामीण भागामध्ये युवक पुढे येऊन वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये मोठ्या धाडसाने उतरत आहे. यामुळे नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध होत आहे. या कंपनीसाठी मी देखील उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून निर्यात करण्यासाठी मोठी मदत करेल.
>
> **– भाऊसाहेब जंजिरे**

# नेवाशात प्रभाग रचनेच्या हरकतींवर तक्रारदार ठाम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा नगरपंचायतीच्या १८ ऑगस्ट रोजी जाहिर झालेल्या प्रारुप प्रभाग रचनेवर आलेल्या ३३ हरकतींवर गुरुवारी, सकाळी ११:३० वाजता नेवासा तहसिल कार्यालयात प्रांताधिकारी सुधीर पाटील व नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या समोर या हरकतींवर सुनावणी घेण्यात आली. ३३ हरकती या प्रभाग रचनेवर आलेल्या असतांना केवळ ३० तक्रारदाराच यावेळी सुनावणी दरम्यान उपस्थित होते. मात्र ते नगरपंचायतीच्या प्रभाग रचनेच्या हरकतींवर ठाम आहेत.



यावेळी नेवासा तहसिल कार्यालयात नगरचे प्रांताधिकारी सुधीर पाटील व नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या समोर घेण्यात आलेल्या हरकतींवर झालेल्या सुनावणीवेळी प्रत्येकाचे प्रांताधिकारी पाटील यांनी स्वतंत्र म्हणणे ऐकून घेत प्रत्येकांच्या हरकती व आक्षेपांवर तक्रारदारांचे म्हणणे यावेळी नोंदविण्यात आले. त्यामुळे झालेली ही सुनावणी तहसिल कार्यालयात मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

> **सुनावणी दरम्यान मान्यवरांची उपस्थिती**
>
> डॉ. करणसिंह घुले, संजय सुखधान, गुफुरभाई बागवान, सतिष गायके, सचिन नागपुरे, भाऊसाहेब वाघ, राजू पोतदार, अँड. अशोक करडक, अमित मापारी, राजू मापारी, राजू मुथ्था, सुनील वाघ, रुपेश उपाध्ये, बंडू शिंदे, नितीन मिरपगार, कृष्णा डहाळे, भारत डोकडे, राजू कडू यांच्यासह आदी सुनावणी दरम्यान उपस्थित होते.

नेवासा नगरपंचायतीच्या सन २०११ च्या जनगणनेनुसार १७ प्रभागांची तयार केलेली प्रारुप रचना १८ ऑगस्ट रोजी नगरपंचायतीने बदल करुन प्रसिद्ध केलेली होती या प्रभाग रचनेवर कोणाच्या काही हरकती असल्यास २१ ऑगस्टपर्यंत हरकती नोंदविण्याचे जाहीर आवाहन यावेळी नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी केलेले होते.

यावेळी रचनेला सुनावणी दरम्यान प्रांताधिकाऱ्यांसमोर हरकतदारांनी विरोध केलेला होता

# खंडाळ्याची ग्रामसभा खेळीमेळीत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**खंडाळा :** श्रीरामपूर तालुक्यातील खंडाळा ग्रामपंचायतची ग्राम सभा किरकोळ अपवाद वगळता शांततेत पार पडली. ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात सरपंच छाया लक्ष्मण बर्डे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपसरपंच भारती राहूल वाघमारे व सदस्यांच्या उपस्थितीत ग्राम सभा संपन्न झाली.

नव्याने रुजू झालेल्या ग्रामपंचायत अधिकारी स्वप्नाली गागरे यांनी मागिल सभेचे इतिवृत वाचन केले. सभेपुढे येणाऱ्या विषयांचे वाचन करतांना प्रत्येक विषयावर ग्रामसभेत चर्चा झाली. आरोग्य सेविका शेख यांनी रुग्ण क्षयमुक्त होण्यासाठी आरोग्य विभागामार्फत मोफत उपचार, एक हजार रुपये महिना व आहार दिला जातो, अशी माहिती दिली. ग्रामपंचायत अधिकारी यांनी नागरिकांना सेतू कार्यालयात जावून जे दाखले मिळतात ते दाखले ग्रामपंचापत कार्यालयात शुल्क भरून मिळतात, अशी माहिती दिली. तसेच ग्रामस्थांनी नव्याने सुरु झालेल्या घंटागाडीचा कचऱ्याचे वर्गीकरण करून वापर करावा, असे सांगितले.

घनकचरा व्यवस्थापन करणारा ठेकेदार येत नाही. त्याला नोटीस देवूनही उपयोग नाही. तेव्हा रिटेन्डर काढावे असे ग्रामस्थांनी सुचविले. तलाठी यांनी शेतकऱ्यांनी ई-पीक पहाणी करावी फार्मर आय.डी. तसेच वारस नोंदी तयार करून घ्याव्यात. अडचण आल्यास कार्यालयात भेटावे, असे आवाहन केले. ग्रामसभेतील चर्चेमध्ये ग्रामस्थांसह सदस्यांचाही सहभाग होता. रस्ता, मुरूम त्यावर झालेल्या खर्चाचा विषय निघाल्यावर काही वेळ गोंधळ झाला. तेवढा अपवाद वगळता सभा शांततेत पार पडली.

# भक्तिमार्ग

**दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवामुळे आपल्याला विलक्षण ऊर्जा मिळते. ही ऊर्जा समाजशक्ती संघटित झाल्याची असते, मनातील सात्विक भाव जागृत झाल्याची असते, देवाच्या निकटच्या सहवासाने मिळालेल्या आत्मिक संतोषाची असते आणि मुख्य म्हणजे दैनंदिन समस्या, अडचणी काही क्षण का होईना बाजूला गेल्याने मिळणारी असते. पण आता गणरायाने या समस्या कायमच्या नष्ट कराव्या आणि चिरंतर समाधानाचा वर द्यावा.**

गणेशोत्सव अगदी उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. पुढल्या वर्षी लवकर या, असं म्हणत भावपूर्ण निरोप देताना मागच्या वर्षी केलेला आग्रह स्मरत यंदा गणराय आपल्या भेटीला येत आहेत! गणपतीचं आगमन दर वर्षीच एक नवं चैतन्य घेऊन येतं. हे दहा दिवस आनंद, मांगल्य, पावित्र्य, सद्भाव आदींनी भारलेले असतात. तसं पहायला गेलं तरी गणपती आले म्हणून नेहमीची व्यवधानं सुटत नसतात. नोकरी–धंद्याचा व्याप ताप, जीव गुदमरुन टाकणारी गर्दी, अनेकांचं उपद्रवमूल्य, आपली क्षणोक्षणी साथ करणाऱ्या चिंता–व्यग्रता–व्यस्तता या सर्वांसहच आपण गणेशाला सामोरं जातो. विक्रमादित्याच्या पाठकुळीवर बसलेल्या वेताळाप्रमाणे या चिंता आणि समस्या सदोदित आपल्यासोबत असतात. या दहा दिवसात ना देशातील वातावरण बदलतं ना जगातील. बदल होतो तो आपल्या अंत:करणात, आपल्या मनात आणि आपल्या भावनेत.

दिवसभर तापाने फणफणलेलं पोर नोकरीवरुन परतलेल्या आईने मायेने कुशीत घेताच विसावतं, वेदना असूनही तिच्या सानिध्यात त्याला वेदना सहन करण्याचं बळ मिळतं अगदी तेच बळ अशा उत्सवांमधून आपल्याला मिळत असतं. म्हणूनच या उत्सवाचं काऊंटडाऊन मनात सतत सुरु असतं. आता तर सोशल मीडिया, पोस्टर्सच्या माध्यमातून ही उत्सवाप्रतीची आतुरता, ही उलटगणती समाजपटलावरही पहायला मिळते. ङ्कबाप्पांना यायला उरले फक्त अमूक दिवसङ्क अशा कॅची लाईन्स नकळत आपल्या भावनांशी तादात्म्य पावतात आणि गणरायाची सरबराई करण्यासाठी, त्याच्या स्वागताच्या सिद्धतेसाठी मनापासून तयारी सुरु होते. रात्रभर जागून केलेली घराची स्वच्छता, गणपतीच्या प्रतिष्ठापनेची, पूजेची समग्र तयारी, सजावट आणि देखाव्यांची पूर्वतयारी, दररोजच्या नेवैद्याची पूर्वतयारी ही चार भिंतीतली धांदल असतेच पण हे सगळं सांभाळून गृहसंकुलात पार पडणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये योगदान देण्यासाठी, एखाद्या कामाची जबाबदारी पार पडण्यासाठीही दिवसातील कामाचे तास आपोआप वाढतात. एरवी दिवसभर काम करुन जीव इतका थकतो की काहीही नकोसं वाटतं. पण तेच गणपतीची तयारी म्हटलं की, अंगात दहा हत्तींचं बळ येतं. कुठून येतं हे बळ, कुठून मिळते इतकी ऊर्जा, कुठून येते ही शक्ती?

ही शक्ती या विशालकाय देवतेच्या रुपात, तिच्या क्षमतेत, सामर्थ्यात दडली आहे. काय नाही पिटूकल्या उंदरावर स्वार होऊन संचार करणाऱ्या या आद्यदेवतेकडे? तिच्याकडे क्षमता आहे त्याचप्रमाणे शक्यता आजमावून पाहण्याची वृत्तीदेखील आहे. तिच्याकडे प्रगाढ बुद्धिमत्ता आहेच पण ती रुक्ष, निरस नाही. शक्ती–बुद्धीची ही देवता ग्रंथाच्या प्रथम ओवीत, चरणात, पाठात, वंदिली जाते. त्याचप्रमाणे लोककलांमधूनही तिलाच प्रथम वंदन होतं. कोणत्याही मंगल कार्याच्या आरंभी वंदिला जाणारा हा गणेश एखाद्या लहानग्याच्या इवल्याशा पाटीवरही हलकेच विसावतो. कोणत्याही अक्षरातून, रेषेतून, आकृतीतून, जिनसातून, वस्तूंमधून साकारली जाणारी या देवतेची प्रतिमा समाजाला काही शिकवणारी आहेच त्याचप्रमाणे घडवणारीही आहे. म्हणूनच नवसाची, कडक देवता असा भीतीयुक्त दबदबा कमी झाला आणि ङ्कबाप्पाङ्क अशी प्रेमळ साद समाजाने घातली तेव्हा जवळच्या नातलगाच्या आपुलकीच्या आवेशात जनसमुदायात येऊन बसला. सोसायटीतील कोपऱ्यांपासून महालांमधील प्रशस्त मखरांपर्यंत कुठल्याही वातावरणाचा स्वीकार करणारी, दहा दिवस लोकांबरोबर मजेत राहणारी, त्यांच्याबरोबर नाचणारी, गाणारी ही देवता आहे. म्हणूनच तिच्यासाठी आधी मनाचा गाभारा सजतो आणि नंतर देवळाराऊळांचा.

आताही गणराय येण्याच्या सिद्धतेत आहेत. वाजत–गाजत आणताना रितीप्रमाणे त्यांचे डोळे झाकले जातील. रेशमी वस्त्राने मुखमंडळ झाकून त्यांना घरात, मंडपात आणलं जाईल. आजूबाजूच्या लखलखाटात कदाचित गणपतीला आपल्यातील, समाजातील वैगुण्य दिसणार नाही अथवा दिसली तरी आपल्या आदरतिथ्याने भारावलेल्या अवस्थेत तो याकडे दुर्लक्ष करेल असा गैरसमज असेल. पण डोळे झाकले तरी त्याची चाणाक्ष नजर प्रत्येक ठिकाणी पोहोचलेच. किंबहुना, ती पोहोचायला हवी. त्याने चांगलं ते बघावंच त्याचबरोबर वाईटही बघावं. मागच्या वर्षी त्याच्या साक्षीने प्रचारकी थाटात




दिलेली किती आश्वासनं पाळली गेली इथपासून वैयक्तिक पातळीवर सोडले गेलेले किती संकल्प तडीस गेले याचा लेखाजोखाही या देवतेने मांडावा.

भक्ती विशेष

काय बदललं हो गेल्या वर्षात? देशपातळीवर म्हणाल तर आज ड्रॅगन डोळे वटारुन उभा आहे. काश्मीरसारखं नंदनवन अतिरेक्यांच्या काळ्या कृत्यांमध्ये घुसमटतंय. शाळकरी पोरांच्या हातातले दगड पाहून ती पोलादी शरीरं घाबरत नसली तरी त्यातील हळवी मनं मात्र नक्कीच कातरं होत असतील. या वर्षी सीमेवर हौतात्म्य पत्करणाऱ्या वीर जवानांच्या सरणाला चूड लावणारे लहानगे आपण पाहिले. तरुण विधवांचा काळजाला घरं पाडणारा आक्रोश ऐकला. यात्रेकरुंच्या गाड्यांना झालेले भीषण अपघात पाहिले. यात्रेकरुंच्या गाड्यांवर झालेले गोळीबार, भीषण अपघात पाहिले. दहशतवादाचा भेसूर चेहरा जागोजागी, प्रांतोप्रांती दिसत राहिला. देशपातळीवर हा तणाव असताना वैयक्तिक पातळीवरील तणाव हाताळण्यात अपयशी ठरल्याने मृत्यूला कवटाळणारे अनेक जीवही आपण पाहिले. मृत्यू, मग तो नैराश्यग्रस्ततेमुळे, नापिकीमुळे, ताणामुळे, अनारोग्यामुळे, सेल्फीसारख्या नसत्या अगोचरामुळे... कशामुळे का आलेला असेना, तो जगण्यापेक्षा स्वस्त झालेला आपण पहात आहोत. पाच वर्षाचा लहानगा असो, पन्नास वर्षाचा प्रौढ असो वा पंचाण्णव वर्षाचा वृद्ध असो... जगण्याचा उबग सगळीकडेच बघायला मिळतोय.

आज कशाकशाचा ताण घेतोय आपण! मुलींवर होणाऱ्या अत्याचारांचा, विवाहितांच्या जाचाचा, मुलांच्या व्यसनाधीनतेचा, गळेकापू स्पर्धेचा, जीवनातून हरवलेल्या शांततेचा... आगामी दहा दिवसात जणू यातील कोणतेच प्रश्न नसल्याच्या आविर्भावात समाजाची वर्तणूक असेल. डीजेच्या भिंतींमध्ये रोजचं कण्हणं दबून जाईल. झुंडीने येणाऱ्या उत्साहलहरीचे दोन–चार शिंतोडे कानावर पडतील. आरतीच्या चढ्या आवाजात रोजच्या संघर्षाचा खडखडाट काही काळ कानाआड ढकलला जाईल. पण नंतर काय? पहिले पाढे पंचावन्न! आता तरी गणरायानं उघड्या डोळ्यांनी हे सगळं पहावं. तो सुखकर्ता आहे, दु:खहर्ता आहे. दु:खाचं परिमार्जन करण्यासाठी तो येतो आहे. तेव्हा त्याने छत्राखालील गैरकृत्यांचा तरी समाचार घ्यावा. त्याचे विशाल कान सूक्ष्मातील सूक्ष्म आवाज टिपणारे आहेत. त्याने जनसामान्यांचा हा हुंकार ऐकावा. त्याचे डोळे लहान असले तरी दृष्टी विशाल आहे. त्याच्या दृष्टीने समाजातील विदारकता पहावी. त्याने ही क्षमता वापरावी, उत्सवमूर्ती असल्याचा परिपूर्ण आनंद लुटावा पण या उत्सवाच्या आड दडून पार पडणाऱ्या गैरकृत्यांचाही समाचार घ्यावा. चौसष्ट कलांच्या या अधिपतीने आजच्या काळात कलाकारांच्या समस्यांची दखल घ्यावी. गणांचा अधिपती असणाऱ्या गणपतीने केवळ मूषकाच्या कानात सांगितल्या जाणाऱ्या गाऱ्हाण्यांचाच नव्हे तर सर्वांच्या मनातील आक्रोशाचाही विचार करावा.

हे गणराया, तू आमचा आहेस. आम्ही तुझा मंडप बांधण्यासाठी खड्डे खणतो, पण त्यात अडखळून उताणे पडतो. तुझ्या रंजनासाठी ङ्कदिल धडकङ्क गाणी वाजवतो पण आमचे कान बधीर होतात. नेत्रदीपक रोषणाई तुझ्यासाठी असते पण वीजेचा धक्का लागून आम्ही मरतो. तुझ्यासाठी रस्त्यावर उतरतो पण गर्दीत अडकलेल्या रुग्णवाहिकेमध्ये कोणाचा तरी प्राण जातो. शेवटी आम्ही हे सगळं तुझ्यासाठी करतो. त्यात आमचा स्वार्थ नाही, चूक तर नाहीच नाही. तू बुद्धी देणार तसे आम्ही वागणार. म्हणूनच आता तरी डोळे उघडून सगळं बघ. तू सद्बुद्धी देत असशील तर दुर्बुद्धीही तूच देतोच हे मान्य कर. सगळी जबाबदारी स्वत:च्या शिरी घे आणि दहा दिवस स्वत:ची काळजी घे...

## लक्षणं पढतमूर्खांची

समर्थ रामदासांनी विविध लक्षणं सांगितली आहेत. या लेखात आपण पढतमूर्खांची लक्षणं जाणून घेऊ. मागां सांगितली लक्षणें। मूर्खाआंगी चातुर्य बाणे। आतां ऐका शाहणे। असोनि मूर्ख। ।१।। तया नांव पढतमूर्ख। श्रोतीं न मनावें दु:ख। अवगुण त्यागितां सुख। प्राप्त होये।।२।। बहुश्रुत आणि वित्पन्न। प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान। दुराशा आणि अभिमान। धरी, तो येक पढतमूर्ख।।३।। मुक्त क्रिया प्रतिपादी। सगुण भक्ती उछेदी। स्वधर्म आणि साधन निंदी तो एक पढतमूर्ख।।४।। आपलेन ज्ञानेपणे। सकळांस शब्द ठेवणे। प्राणीमात्रांचे पाहे उणें। तो येक पढतमूर्ख।।५।। शिष्यास अवज्ञा घडे। कां तो संकटी पडे। जयाचेनि शब्दें मन मोडे। तो येक पढतमूर्ख।।६।।



समर्थ म्हणतात, शहाणे असूनही मूर्खासारखे वागणाऱ्या लोकांना पढतमूर्ख असं म्हटलं जातं. अशी काही लक्षणं आपल्या ठिकाणी आहेत असं वाटलं तरी श्रोत्यांनी दु:ख मानू नये. अवगुणांचा प्रयत्नपूर्वक त्याग केला तर सुख लाभेल. त्यामुळे श्रोत्यांनी वृथा चिंता करू नये, असं समर्थ सांगतात. पढतमूर्खाची लक्षणं विषद करताना ते म्हणतात, जो बहुश्रुत आणि विपन्न आहे तो प्रांजळपणे ब्रह्मज्ञान कथन करतो पण ज्याच्या मनात दुराशा आणि अभिमान असतो तो एक पढतमूर्ख होय. जो सगुण आणि भक्तीचा उच्छाद करतो. स्वधर्म आणि साधनांची निंदा करतो तो पढतमूर्ख मानला जातो.

दासबोध

जो माणूस स्वत:चं ज्ञान पाजळतो, इतरांना बोल लावतो. समस्त प्राणीमात्रांचे वाईट इच्छितो तो पढतमूर्ख आहे. ज्याच्यामुळे शिष्याला अवज्ञा घडते, शिष्य संकटात पडतो, ज्याच्या शब्दांनी मन मोडतं तो पढतमूर्ख असतो. समर्थ अखेरीस म्हणतात की, परम मुर्खामाजी मूर्ख। जो संसारी मानी सुख।। या संसारदु:खा ऐसे दु:ख। आणिक नाहीं।। ४०।। तेचिं पुढे निरूपण। जन्मदु:खाचे लक्षण। गर्भवास हा दारूण। पुढे निरूपिला।।४१।। संसारात सुख मानणारी व्यक्ती पढतमूर्खांमध्ये मूर्ख मानली जाते. या संसारदु:खासारखे दुसरे कोणतेही दु:ख नाही. जन्मदु:खाच्या निरूपणाबद्दल पुढे वर्णन केलं आहे. गर्भवास हा अत्यंत दारूळ असतो.

पुढच्या समासांमध्ये याचं निरूपण करण्यात आलं आहे.

## महालक्ष्मीचा फोटो घेताना...



शुक्रवार हा महालक्ष्मीचा वार मानला जातो. या दिवशी अनेकजण महालक्ष्मीचं व्रत करतात. या दिवशी लक्ष्मीची पूजा केल्याने धन आणि वैभवाची प्राप्ती होते असं म्हटलं जातं. शुक्रवारी हत्तीची मूर्ती घरी आणणं शुभ मानलं जातं. या माध्यमातून आपल्या बऱ्याच मनोकामना पूर्ण होऊ शकतात. देवी लक्ष्मीला हत्ती खूप प्रिय आहे. या दिवशी हत्ती घरी आणला तर देवी प्रसन्न होते, असं मानतात. त्यामुळे घरात असलेल्या लक्ष्मीदेवीच्या चित्रात हत्ती असणं गरजेचं आहे. हत्ती नसलेली देवीची प्रतिमा अपूर्ण आहे, असं मानलं जातं. म्हणूनच पूजनासाठी लक्ष्मीची प्रतिमा विकत घेताना काही गोष्टी लक्षात घेणं गरजेचं आहे. महालक्ष्मी ही वैभव आणि समृद्धीची देवता आहे. ती प्रसन्न झाली तर आपण वैभवसंपन्न आयुष्य जगू शकतो. लक्ष्मीची तसबीर घेताना त्यात देवीच्या डाव्या आणि उजव्या बाजूला हत्ती असायला हवेत. तसंच हे हत्ती वाहत्या पाण्यात उभे असणं गरजेचं असतं. त्यातच हत्तीच्या सोंडेत वाहत्या पाण्याचा कलश असेल तर ते अधिक शुभ मानलं जातं. घरात कुबेराचा फोटो किंवा मूर्ती असेल तर देवी लक्ष्मी प्रसन्न होते. कुबेर हा जगातल्या धनसंपत्तीचा रक्षक मानला जातो. कुबेराची मूर्ती असलेलं स्थान स्वच्छ असायला हवं.

जाणून घ्या

लक्ष्मी आणि कुबेराच्या पाऱ्याच्या मूर्ती अधिक लाभदायी मानल्या जातात. लक्ष्मी आणि गणपतीची चांदीची मूर्तीही घेता येईल. देवी लक्ष्मीच्या चांदीच्या पादुकाही मिळतात. या पादुका अत्यंत पवित्र मानल्या जातात. पादुका घरात ठेवल्याने देवी लक्ष्मीची कृपा राहते असं म्हटलं जातं.

## देवाला नका देऊ दोष!



परमेश्वराबद्दल तक्रार करणारे अनेकजण असतात. काहीही खुट्ट झालं की देवाला दोष देऊ लागतात. आयुष्यात एखादी अप्रिय घटना घडली तरी देवाला दोषी धरलं जातं आणि परमेश्वराने आजवर जे दिलं त्याकडे साफ दुर्लक्ष केलं जातं. अशा लोकांसाठी कृष्ण आणि सुदाम्याची ही कथा प्रेरक ठरू शकते. कृष्ण आणि सुदामा यांच्या मैत्रीबद्दल आपण बरंच ऐकून आहोत. या दोघांमध्ये प्रचंड प्रेम होतं. कृष्ण आणि सुदामा कायम एकत्र असत. कोणतंही काम ते एकत्रच करत असत. एकदा दोघं वनसंचारासाठी गेले होते पण रस्ता विसरले. दोघेही उपाशी होते. ते एका झाडाजवळ पोहोचले. त्या झाडावर एकच फळ होतं. कृष्णाने घोड्यावर चढून ते फळ तोडलं. त्याचे सहा तुकडे केले आणि सवयीप्रमाणे पहिला तुकडा सुदामाला दिला. सुदामाला फळ खूप आवडलं. तो कृष्णाला म्हणाला, असं फळ आजवर कधीही खाल्लं नव्हतं. अजून एक तुकडा दे ना. अशा प्रकारे सुदामाने श्रीकृष्णाकडून पाच तुकडे मागितले. आता अखेरचा तुकडाही त्याला हवा होता. मग मात्र कृष्ण वैतागला. तो म्हणाला, मी सुद्धा उपाशी आहे. माझं तुझ्यावर प्रेम आहे पण तुला काहीही वाटत नाही. असं म्हणून कृष्णाने फळाचा तुकडा तोंडात टाकला. तुकडा तोंडात टाकताच त्याने तो थुंकून टाकला. ते फळ खूपच कडू होतं. कृष्ण सुदाम्याला म्हणाला की, तुला वेड तर नाही लागलं? एवढं कडू फळ तू कसं खाल्लं? यावर सुदाम्याने फार छान उत्तर दिलं. तो म्हणाला,

बोध

ज्या हातांनी आजवर इतकी गोड फळं दिली त्याने दिलेल्या एका कडू फळाची तक्रार कशी करू? म्हणून मी हे फळ खाल्लं. तुला कडू फळ खावं लागू नये, यासाठी मी हे केलं. सुदाम्याच्या या उत्तराने कृष्ण खूपच भारावून गेला. आयुष्यात सगळं काही मनासारखं घडत असताना एखादी गोष्ट चुकीची घडली तरी देवावर खापर फोडणाऱ्यांनी या कथेतून बोध घ्यायला हवा.



## कृतज्ञता व्यक्त करू या

भारत हा कृषीप्रधान देश मानला जातो. सुजलाम सुफलाम अशी ही आपली मातृभूमी. हिरवी हिरवी शेतं आपल्याला खुणावत असतात. देशातल्या नागरिकांना अन्न मिळावं यासाठी शेतकरी झटत असतो. याच शेतकऱ्याची इमानेइतबारे साथ देणारा प्राणी म्हणजे बैल. भारतीय संस्कृतीत प्राण्यांना मानाचं स्थान आहे. प्राण्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे अनेक सण आपण साजरे करतो. नागपंचमीला नागाची पूजा करतो तर पोळा हा सण खास बैलांचा. श्रावणातल्या अमावस्येला बैलपोळा असतो. या दिवशी शेतकरीवर्ग बैलाची पूजा करतो. बैलाने आजवर दिलेल्या साथीप्रती आदरभाव व्यक्त करण्याचा हा छोटासा प्रयत्न असतो. भारताने कितीही प्रगती केली असली, उद्योग–व्यवसाय वृद्धींगत होत असले तरी आपली अर्थव्यवस्था आजही कृषीप्रधान आहे. देशाची मोठी लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. शेती आणि दुधदुभती जनावरं हेच त्यांच्या उत्पन्नाचं साधन आहे. खरं तर शेतकरी हा राजा असायला हवा. म्हणूनच त्याला बळीराजा असं म्हटलं जातं. शेती हा उत्तम व्यवसाय होऊ शकतो. लोकांचं पोट भरण्याचं पुण्य हा व्यवसाय देतो. अन्नधान्य पिकलंच नाही तर आपण खाणार तरी काय, असा प्रश्न पडायला हवा.

सण–उत्सव

आज आपल्याकडच्या शेतकऱ्याची दुरवस्था झाली आहे. नापिकी, कर्जबाजारीपणा, दुष्काळ यामुळे गावोगावचा शेतकरी त्रस्त झाला आहे. पावसाआधी आभाळाकडे डोळे लावून बसलेला शेतकरी आपल्याला दिसतो. आजचा तरूण शेतीकडे वळत नाही. शेतीला वलय नसल्याचं कारण यामागे दिलं जातं. पण प्रत्यक्षात शेतीसारखा वलयांकित व्यवसाय नाही. भारतातला शेतकरी हा प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून असतो. पण अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि मेहनत यांच्या जोरावर नवी पिकं घेणारे शेतकरीही आहेत. वैराण जमिनीवरही अनेकांनी बाग फुलवली आहे. निरनिराळी पिकं घेतली जात आहेत. अशी अनेक उदाहरणं आपल्या आसपास पहायला मिळतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी खचून न जाता मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर शेत फुलवायला हवं.

बैलाकडून आपल्याला हा धडा घेता येईल. जमीन कितीही नापीक असली तरी तो मेहनत करणं सोडत नाही. मालकाच्या खांद्याला खांदा लाऊन तो काम करत असतो. शेवटपर्यंत तो मालकाची साथ देतो. कधीही हार मानत नाही. त्यामुळे पोळ्याच्या निमित्ताने बैलाची पुजा करण्यासोबतच त्याच्या अंगचे काही गुणही आपण घ्यायला हवे. आपल्या घरच्या रांगड्या बैलाची साथ असली की काहीही अशक्य नसतं. कोणत्याही परिस्थितीतून बाहेर पडता येतं, हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवं. शेतीकडे सकारात्मक दृष्टीकोनातूनच पहायला हवं. शेतकरी टिकला तरच आपण टिकणार आहोत, हे प्रत्येकाने लक्षात घ्यायला हवं. यासाठी शेतकऱ्याच्या कल्याणाच्या योजना राबवायला हव्यात. सरकार, जनता आणि शेतकरी एकत्र आले तर बळीराजाचं राज्य यायला वेळ लागणार नाही.

## कोण होतं यशस्वी?

जगात प्रत्येक व्यक्तीला यशस्वी व्हायचं आहे पण अपयशाच्या भीतीने अनेकजण पुढे जात नाहीत. अयशस्वी होण्यामागे नशीब नसतं तर त्याला आपण स्वत:च जबाबदार असतो. आर्य चाणक्याने काही गोष्टी नमूद केल्या आहेत, काही नियम सांगितले आहेत. या नियमांचं पालन करणारी व्यक्ती कधीही अयशस्वी होत नाही.



✻ माणसाने आपले हात, कान आणि डोळे उघडे ठेवायला हवेत. म्हणजे आपल्या आसपास घडणाऱ्या घटनांकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. माणसाने जागरूक असायला हवं.

✻ माणसाकडे ज्ञान असायला हवं. पण फक्त पुस्तकी ज्ञान असून भागत नाही. प्रत्येक विषयाची सखोल माहिती म्हणजे ज्ञान, असं आर्य चाणक्य म्हणतात. चांगलं आणि वाईट याची ओळख माणसाला असायला हवी. आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक असेल तर कधीही अपयश येत नाही.

✻ माणसाने थोडा तरी धनसंचय करायला हवा. वाईट वेळ कधी येईल हे सांगता येत नाही. त्यामुळे आपल्याकडच्या सर्व संपत्तीचा व्यय करण्याऐवजी थोडा पैसा जवळ ठेवायला हवा.

✻ माणसाकडे आत्मविश्वास असायला हवा. आत्मविश्वास असला की सगळं काही शक्य होतं. माणसाने स्वत:वर विश्वास ठेवायला हवा. आत्मविश्वास असलेल्या व्यक्तीला अपयश येत नाही. स्वत:वर पूर्ण विश्वास असलेली व्यक्ती कोणत्याही वाईट परिस्थितीतून बाहेर पडू शकते.

चाणक्यनीती

✻ अनेकदा आपल्याला केलेल्या मेहनतीच्या तुलनेत खूप कमी यश मिळतं. एवढी मेहनत करून काय उपयोग, असा प्रश्न आपल्याला पडतो पण माणसाने सतत मेहनत करायला हवी, असं चाणक्य सांगतात. मेहनतीकडे काही काळ दुर्लक्ष होऊ शकतं पण मेहनतीला पर्याय नाही. मेहनती व्यक्तीला अपयशाचं तोंड पहावं लागत नाही.

## गुरूवायूरप्पन मंदिर

भगवान श्रीकृष्ण हा विष्णूचा अवतार. भारताच्या उत्तरेकडच्या राज्यात श्रीकृष्णाची अनेक मंदिरं आहेत. दक्षिणेतही श्रीकृष्णाची आराधना केली जाते. केरळमधल्या गुरूवायूर या ठिकाणी श्रीकृष्णाचं महत्त्वाचं मंदिर आहे. या स्थानाला दक्षिण द्वारका असंही संबोधलं जातं. हे स्थान केरळमधल्या प्रसिद्ध तीर्थस्थानांपैकी एक आहे. गुरूवायूर हे त्रिशूर जिल्ह्यातलं एक गाव आहे. या मंदिरासंबंधी एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, देवांचे गुरू बृहस्पती यांना कलियुगाच्या सुरूवातीला भगवान श्रीकृष्णाची एक मूर्ती सापडली. मग वायूदेवाच्या मदतीने त्यांनी त्याच स्थानी या मूर्तीची स्थापना केली. त्यामुळे या स्थानाचं नाव गुरूवायूर पडल्याचं बोललं जातं.

गुरूवायूर हा शब्द तीन शब्द मिळून बनला आहे. गुरू म्हणजे देवगुरू बृहस्पती. वायू म्हणजे वायूदेव आणि ऊर हा मल्याळम भाषेतला शब्द आहे. ऊर म्हणजे भूमी. गुरूवायूर म्हणजे गुरू, वायू आणि भूमी. या मंदिराला गुरूवायूरप्पन मंदिर असं म्हटलं जातं. कृष्णमूर्ती हे इथलं खास आकर्षण. ही मूर्ती लोभसवाणी आहे. या तिला चार हात आहेत. एका हातात शंख, दुसऱ्या हातात सुदर्शनचक्र तर



तिसऱ्या हातात बासरी आणि चौथ्या हातात कमळ आहे. या मंदिराला ङ्कभूलोक वैकुंठमङ्क असंही म्हणतात. कोचीनच्या विमानतळापासून ८८ किलोमीटर अंतरावर हे मंदिर वसलं आहे. उत्सवकाळात गुरूवायूर मंदिर छान सजवलं जातं. देशभरातले भाविक या ठिकाणी येत असतात. श्रीकृष्णाच्या भक्तांसाठी हे स्थान अत्यंत महत्त्वाचं आहे.

तीर्थक्षेत्र

दैनिक जनता आवाज

रविवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ । अहिल्यानगर । पान नं. ८

# ‘साईबाबा’ची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** श्री साईबाबा संस्थानला जागतिक स्तरावर मोठा सन्मान प्राप्त झाला आहे. संस्थेची नोंद ग्लोबल बुक ऑफ एक्सलन्स, इंग्लंड वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये करण्यात आली आहे.

श्री साईबाबांच्या कृपेने लाखो भाविकांच्या श्रद्धास्थान ठरलेल्या या संस्थेच्या कार्याची दखल घेऊन वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र ग्लोबल बुक ऑफ एक्सलन्स, इंग्लंड चे अध्यक्ष डॉ. मनिष कुमार व उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके तसेच कार्यकारी संचालक जितेंद्र मित्तल यांनी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांचेकडे प्रदान केले. यावेळी संस्थानचे प्र. उप मुख्यकार्यकारी अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी संदिपकुमार भोसले, प्र. प्रशासकिय अधिकारी विश्वनाथ बजाज, मुख्य कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे तसेच सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

या जागतिक मान्यतेमुळे श्री साईबाबा संस्थानचे धार्मिक, सामाजिक व मानवसेवेतील योगदान अधोरेखित झाले आहे.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे ठिय्या आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असलेली पोषण आहाराची बिले मिळावी, यासह अन्य मागण्यांसाठी वैजापूर तालुक्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करून प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.



आयटक सलग्न असलेल्या महाराष्ट्र राज्य अंगणवाडी व बालवाडी कर्मचारी युनियनच्यावतीने राज्य सचिव कॉम्रेड शालिनी पगारे यांच्या नेतृत्वाखाली हे धरणे आंदोलन करण्यात आले. वैजापूर तालुक्यातील सात बीट मधील पोषण आहाराची बिले १४ महिन्यांपासून मिळाली नसल्याने संतप्त अंगणवाडी सेविकांनी यावेळी प्रशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी संतोष जाधव यांना आंदोलनकर्त्यांनी विविध मागण्यांचे निवेदन दिले. या आंदोलनात शोभा तांदळे, शबाना शेख, कल्पना माळी, पंचशीला धनेश्वर, सोनी चव्हाण, नंदा ठेंगडे, बिजला काळे, संजीवनी पंडागळे, रत्ना गोंधळे, निर्मला बोरगे, सुनिता बोढरे, मंदाकिनी जाधव, सुरेखा साळुंके, संगीता बत्तीशे, मनीषा बागुल, लीला बागुल, छाया माने यांचसह अंगणवाडी कर्मचाऱ्यांना या आंदोलनात सहभाग घेतला.

# नगरमधून १२० किलो गांजा पकडला

## ८१ लाखांचा मुद्देमाल केला जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शहरातून विक्रीसाठी जाणारा सुमारे १२० किलो गांजा पोलिसांनी पकडला. या प्रकरणी दोघांना पोलिसांनी गजाआड केले आहे. त्यांच्याकडून सुमारे ८१ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, ओडीसा राज्यातून अंमली पदार्थ गांजा खरेदी करुन तो जिल्ह्यात विक्रीसाठी येत असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. या



माहितीनुसार अहिल्यानगर ग्रामीण उपविभागातील फॉरेन्सिक टिमसह शेंडी बायपास ते एम.आय.डी.सी. जाणारे रोडवर वडगांव गुप्ता गावचे शिवारातील हॉटेल किनाराजवळ सापळा रचून थांबले असता संशयीत ट्रक येताना दिसला. सदर ट्रक चालकास त्याचे ताब्यातील ट्रक रोडचे कडेला थांबविण्यास सांगितले. सदरच्या ट्रकची झडती घेतली असता त्यामध्ये गांजाची पोते आढळून आले.

याप्रकरणी पोलिसांनी ट्रकमधील दोघांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी ओडीसा राज्यातून हा गांजा विक्रीसाठी आणण्यात आल्याची कबुली दिली. पोलिसांनी नवनाथ अंबादास मेटे (वय ३८, रा. ढोरजे, ता. श्रीगोंदा), ज्ञानेश्वर दत्तात्रय फुंदे (वय ३१, रा. मळेगांव, ता. शेवगाव) यांना अटक केली. त्यांचाकडून नवनाथ अंबादास मेटे रा. श्रीगोंदा व नवनाथ मेटे याचा एक साथीदार यांचेकडील ट्रक क्रमांक एम.एच. १४ जी. यु. २१११ हिमध्ये भरुन विक्री करण्याकरीता आणलेला असल्याची माहिती मिळाली.

### पोलिसांनी जप्त केलेला मुद्देमाल

६ गोण्यामध्ये ३० हजार २२, ६२५ रुपये किमतीचा १२० किलो ९०५ ग्रॅम गांजासह एकुण ८०, ८३, ४६४ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांकडे सखोल चौकशी करता त्यांनी सदरचा गांजा हा त्यांचे साथीदार यांचा असुन तो विक्रीकरीता आणला असल्याचे सांगितले आहे.

# नेवासे तालुक्यात जोरदार पावसाची हजेरी

## पिकांचे नुकसान; शेतकऱ्यांची उडाली तारांबळ



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील आठही महसूल मंडल क्षेत्रात सुरू झालेल्या पावसाने तालुक्यातील विविध भागातील ओढे, नाले ओसंडून वाहू लागले. तालुक्यातील मुळा प्रवरा गोदावरी आधीचं दुथडी भरून वाहत आहेत. शेतामध्ये पाणी साचल्याने कपाशी मका घास ऊस पिकांना मोठा फटका बसला आहे. सलाबतपूर मंडलात सर्वाधिक ११९ मिलिमीटर तर घोडेगाव मंडलात सर्वात कमी २७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

नेवासा शहरात गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास सुरू झालेल्या पाऊस रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याने शहर व परिसरातील रस्त्यावरील ओढ्याला मोठ्याप्रमाणावर पाणी आल्याने नागरिकांना पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागला.

नेवासा तालुक्यात पहिल्यांदा अशा दमदार पावसाचे आगमन झाले. गुरुवारी पासून तालुक्यातील काही मंडलात पावसाच्या जोरदार सरी बरसण्यास सुरुवात झाली. रात्री आठ वाजे नंतर ही पावसाने जोर धरला, काही गावात शेतातील पिकांमध्ये पाणी साचले तर काही भागात ओढ्याचे पाणी शेतात शिरले.

तालुक्यातील विविध भागात खरीपातील सोयाबीन, मका, कपाशी, तुर, बाजरी, ऊस पिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने पिके धोक्यात आली आहे.

### मंडल निहाय पाऊस

नेवासाखुर्द – ८४ मिलिमिटर, नेवासा बुद्रुक – ६०, कुकाणा – ७२, सलाबतपूर – ११९, वडाळा – ६३, घोडेगाव – २७, चांदा – ३०, सोनई – ४८ मिलिमिटर असा पाऊस पडलेला आहे.

# ८० लाखांच्या प्लेटा चोरणारी टोळी पकडली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** ट्रक ट्रेलरला चारचाकी वाहन आडवे मारून ट्रेलरमधील ट्रान्सपोर्टचे वारी एनर्जी कंपनीच्या सोलर प्लेटा चोरून नेणाऱ्या आरोपीला अटक करून ८० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल मिरजगाव पोलीस स्टेशनकडून हस्तगत केला आहे.

याबाबत असे की, दि. ०४ ऑगस्ट २०२५ रोजी अहिल्यानगर ते सोलापूर जाणारे रोडबर, हॉटेल चौधरी समोर, मिरजगाव, कर्जत येथे फिर्यादी महेंद्र पांडुरंग अलदर (वय ३३, रा. शेरनांदगी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर) हे त्यांचे ताब्यातील अशोक लेलंड कं.चा ट्रेलर घेवून जात असताना, एका इटिंगा कारने त्याची इटिंगा गाडी ट्रेलरला आडवी मारुन इटिंगा गाडी मधुन ४ जन खाली उतरले आणि महेंद्र पांडुरंग अलदर यास धमकावून ट्रेलर व त्यामधील सोलर प्लेटा असा एकूण ८०,०६,९९० रुपयांचा मुद्देमाल पैशाचे व्यवहारातून जबरदस्तीने चोरून रॉबरी करून घेवून गेले होते. या नंतर मिरजगाव पोलीस स्टेशनला या प्रकरणी गुन्हा दाखल आहे.

मिरजगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड, व तपास पथकातील अंमलदार सहाय्यक फौजदार शंकर रोकडे, पोहेकों प्रबोध हंचे, पोलीस अंमलदार सुनिल खैरे, समीर सय्यद यांनी गोपनीय माहितीचे आधारे व तांत्रिक तपासाचे आधारे दाखल गुन्ह्यातील आरोपी रणजित अरूण जाधव (वय २४, रा. बंडी शेगाव, ता. पंढरपुर, जि. सोलापूर यास म्हसवड, जि. सातारा) येथून ताब्यात घेवून त्याचे ताब्यातून एकुण ८०,०६,९०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांचे मार्गदर्शनाखाली सफो शंकर रोकडे हे करत आहेत.

# देवस्थानांच्या विकासकामांना मान्यता

## आमदार आशुतोष काळे यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** धार्मिक व ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या कोपरगाव तालुक्यात अनेक धार्मिक देवस्थान असून लाखो भाविकांचे ते श्रद्धास्थान आहेत. यात्रा उत्सवाप्रसंगी दरवर्षी लाखो भाविक या धार्मिक स्थळी दर्शनासाठी येतात. येणाऱ्या भाविकांना उच्च दर्जाच्या सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी या देवस्थानांना क वर्ग दर्जा मिळवून दिला आहे. त्यामुळे देवस्थानच्या विकासासाठी शासनाकडून निधी मिळविण्याचा मार्ग मोकळा होवून तालुक्यातील चार देवस्थानांना ५० लाखाचा निधी मंजूर करून आणला होता. या विकास कामांना तातडीने प्रशासकीय मान्यता मिळावी, यासाठी सुरु असलेल्या पाठपुराव्यातून या ५० लाखाच्या विकास कामांना नुकतीच प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून लवकरच विकास कामांना सुरुवात होणार असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांनी दिली आहे.



यामध्ये माहेगाव देशमुख येथील श्री अमृतेश्वर मंदिर परिसर सुशोभिकरण करणे (२० लाख), चांदेकसारे येथील श्री क्षेत्र भैरवनाथ जोगेश्वर मंदिर परिसर सुशोभिकरण करणे (१० लाख), भोजडे येथील श्री राजा वीरभद्र देवस्थान मंदिर परिसर सुशोभिकरण करणे (१० लाख), कोकमठाण येथील श्री लक्ष्मी माता मंदिर देवस्थान या ठिकाणी पथदिवे बसविणे (१० लाख) या देवस्थानांचा समावेश असून या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना अधिकच्या सोयी सुविधा मिळून त्यांच्या अडचणी दूर होणार आहेत.

### तीर्थक्षेत्रांना ‘क’ वर्गाचा दर्जा

कोपरगाव मतदार संघाची धार्मिक परंपरा जपतांना मतदार संघातील सर्व धार्मिक स्थळांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आ. आशुतोष काळे यांनी विशेष प्रयत्न करून अनेक तीर्थक्षेत्रांना ‘क’ वर्ग दर्जा मिळवून दिला. ‘क’ वर्ग दर्जा मिळाल्यामुळे संबंधित तीर्थक्षेत्रांना शासनाकडून अधिक प्रमाणात निधी उपलब्ध होऊन विकासकामे गतिमान होत आहेत.

# घुलेवाडीची परंपरा जपण्यासाठी गाव एकवटले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** तथाकथित कीर्तनकार प्रकरणामुळे चर्चेत आलेल्या घुलेवाडी गावामध्ये अनेक दिवसांपासून अशांतता व नागरिकांमध्ये अस्वस्थता आहे. असे वातावरण यापूर्वी कधीही नव्हते. घुलेवाडी गाव हे कायम पुरोगामी व वारकरी संप्रदायाच्या विचारांचे राहिले आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली गावची वैभवशाली परंपरा जपण्यासाठी सर्व गाव एकत्र आले असून विष कालवणाऱ्या प्रवृत्तींना यापुढे वेळीच रोखले जाईल, असा एकमुखी ठराव ग्रामस्थांनी केला आहे.

याचबरोबर घुलेवाडी येथे झालेल्या प्रकरणात वारकरी संप्रदायातील कीर्तनकार समाज प्रबोधनकार पत्रकार यांनी वस्तुस्थिती चांगली मांडणी करून तथाकथित कीर्तनकाराचा पडदा फाडल्याबद्दल संपूर्ण गावाने या मान्यवरांचे अभिनंदन केले आहे. मारुती मंदिरा समोरील झालेल्या गावच्या बैठकीमध्ये हा एकमुखी ठराव घेण्यात आला. यावेळी सिताराम राऊत, सखाराम महाराज तांगडे, सरपंच निर्मला राऊत, तंटामुक्तीचे अध्यक्ष बाळासाहेब पानसरे, ज्येष्ठ कार्यकर्ते बाळासाहेब कारभारी पानसरे, भास्कर पानसरे, भागवत काशीद, रामनाथ राऊत, मच्छिंद्र ढमाले, पोपट आगलावे आदी उपस्थित होते.



सिताराम राऊत म्हणाले की, घुलेवाडी गावाने तालुक्याला दिशा दिली आहे. मात्र मागील काही दिवसांमध्ये गावांमध्ये विविध घडामोडी घडल्या असून चुकीच्या गोष्टींमुळे गाव राज्यात चर्चेत आले आहे. अशावेळी सर्व वारकरी संप्रदायातील कीर्तनकार, प्रबोधनकार, साहित्यिक, पत्रकार यांनी सत्याची बाजू घेऊन पुरोगामी विचार भक्कम केला आहे. या गावांमध्ये नथुरामांच्या विचारांना कधीही थारा दिला जाणार नाही असे सांगताना विष कालवणाऱ्या प्रवृत्तींना वेळीच रोखा असे आवाहन त्यांनी केले.

# आयुक्तांकडून पाणीसाठ्यांची तपासणी

## नागरिक, विद्यार्थी, आशा सेविकांचा उत्स्फूर्त सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** एडीस इजिप्ती हा डेंगू डास स्वच्छ साचलेल्या पाण्यात अंडी घालतो आणि दिवसा गुडघ्याखाली चावतो. त्यामुळे शरीरातील पांढऱ्या पेशी कमी होतात. लहान मुले आणि वयोवृद्ध यांना या आजाराचा सर्वाधिक त्रास होतो. काही वेळा डेंगूमुळे मृत्यूही संभवतो. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या वतीने ‘‘डेंगू मुक्त अहिल्यानगर’’ अभियान सुरू असून विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी व आशा सेविका नागरिकांच्या घरोघरी जाऊन पाणीसाठ्यांची तपासणी व जनजागृती करत आहेत. या उपक्रमामुळे डेंगूवर नियंत्रण मिळाले असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.



फकीरवाडा मुकुंदनगर येथे आयोजित अभियानात आयुक्त यशवंत डांगे, माजी नगरसेवक योगीराज गाडे, असिफ सुलतान, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. रजत येवले, मुख्याध्यापिका संगीता लांडगे, प्रभाग अधिकारी श्याम गोडळकर, दीक्षा घाटविसावे, नीता रसाळ, योगेश गुंड आदी मान्यवर उपस्थित होते. माजी नगरसेवक योगीराज गाडे म्हणाले की, डेंगू मुक्त अभियानामुळे नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होत आहे.

### आयुक्तांकडून विद्यार्थ्यांना संदेश

आयुक्त यशवंत डांगे यांचा विद्यार्थ्यांना संदेश देताना म्हटले की, ‘‘विज्ञान शाप की वरदान? सोशल मीडियाचा वापर चांगल्या कामासाठी केल्यास वरदान, वाईट कामासाठी केल्यास शाप. मोबाईलकडे आकर्षित न होता अभ्यास व खेळाकडे लक्ष द्या. सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन समाजात जनजागृती करा. आपले घर व परिसर स्वच्छ ठेवा आणि आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळा. असा संदेश देण्यात आला.

# देवटाकळी–जोहरापूर पूल गेला वाहून

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील देवटाकळी–जोहरापूर रस्त्यावरील देवटाकळी येथील रेडी नदीवरील तात्पुरते बाह्यवळण पुल नदीच्या प्रवाहात तिसऱ्यांदा वाहून गेला असून, ठेकेदाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे एकाच ठिकाणी तिसरी वेळ असून तीन महिन्यांत तिसऱ्यांदा हा रस्ता वाहून गेल्याने ठेकेदाराचा हलगर्जीपणा दिसून येत आहे.या पुलावरून वाहतूक बंद झाली आहे. त्यामुळे देवटाकळी येथील नागरिक आंदोलनाच्या तयारीत आहेत.

जोहरापूर देवटाकळी या मार्गावरील देवटाकळी येथील रेडी नदीच्या पुलाचे काम ठेकेदाराने मे च्या दुसऱ्या आठवड्यात सुरू केले होते. त्यावेळेस दळणवळणच्या दृष्टीने शेजारीच बाह्य वळण रस्ता तयार केला होता. २० मेरोजी झालेल्या अवकाळी पावसामध्ये प्रथम बाह्य वळण पूल वाहून गेला होता. त्यानंतर त्याची दुरुस्ती करून वाहतुकीसाठी हा पूल पुन्हा सुरू केला होता. मात्र, १५ ऑगस्ट रोजी झालेल्या पावसात दुसऱ्यांदा तो पूल वाहून गेला होता. पावसाच्या पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने वाहतूक आठवडाभर बंद होती.

देवटाकळी ग्रामस्थांनी १९ ऑगस्ट रोजी जलसमाधी आंदोलन केल्यानंतर २५ ऑगस्ट रोजी पुन्हा पुल तयार करण्यात आला होता. मात्र, २८ ऑगस्ट रोजी झालेल्या पावसाने पुन्हा तिसऱ्यांदा पूल वाहून गेला आहे.त्यामुळे देवटाकळी–जोहरापूर मार्गावरील वाहतूक ठप्प झाली आहे. सद्या वाहतूक भातकुडगाव फाटा मार्गे वळवली आहे. त्यामुळे वाहन चालकांना सहा किलोमीटरचा वळसा घालून जावे लागत आहे.

# आरडगावमध्ये बिबट्या जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मानोरी :** गेल्या काही दिवसांपासून आरडगाव शिवारात दहशत दहशत निर्माण करणारा एक बिबट्या बुधवारी रात्री अखेर पिंजऱ्यात अडकला. दादासाहेब काळे यांच्या वस्तीवर लावलेल्या पिंजऱ्यात हा बिबट्या कैद झाला असून, ही घटना समजताच शेकडो ग्रामस्थांनी घटनास्थळी गर्दी केली.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, सध्या या परिसरात अजून दोन ते तीन बिबटे फिरत असल्याची शक्यता असून, त्यांच्याकडून पाळीव जनावरांवर हल्ले होत आहेत. अनेक कुत्रे, शेळ्या व कोंबड्यांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांची वनविभागाकडे मागणी ‘फक्त एक बिबट्या पकडल्याने दिलासा मिळाला असला तरी धोका पूर्णपणे टळलेला नाही. अजूनही परिसरात बिबटे सक्रिय आहेत. त्यामुळे इतर संभाव्य ठिकाणी देखील पिंजरे लावावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. वनविभागाची कारवाई सुरू वनविभागाने तातडीने घटनास्थळी जाऊन बिबट्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले.

# आ. तांबेंकडून शिक्षण विभागाची झाडाझडती

## प्रलंबित प्रश्नांबाबत कालावधी निश्चित करण्याच्या सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** नाशिक पदवीधर विभागाचे आमदार सत्यजित तांबे यांनी काल जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागाची आढावा बैठक घेऊन अनेक वर्षांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

दोन्ही शिक्षणाधिकाऱ्यांनी विहित वेळेमध्ये प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत अशा सूचना त्यांनी केल्या. प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या मासिक टूरचा अहवाल



सादर करण्याचे आदेश देतानाच शिक्षणाधिकाऱ्यांनी तालुका स्तरावर पंचायत समितीच्या शिक्षण विभागाला भेटी देऊन तालुकास्तरावरील प्रश्न गटविकास अधिकाऱ्यांच्या सोबतीने निकाली काढावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

आमदार तांबे यांच्या या आढावा बैठकीत अनेक तालुक्यातील गटशिक्षणाधिकाऱ्यांचा ढिसाळ कारभार उघडा पडला.प्रशासनामध्ये सुसूत्रता नसल्याने छोटे छोटे प्रश्न प्रलंबित राहिल्याचे दिसून आले. संगमनेरचे गटशिक्षणाधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले तर विद्यार्थ्यांच्या प्रश्नाबाबत कोणी ही चर्चा केली नाही, असा चिमटाही त्यांनी उपस्थित शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना काढला.

दुपारी सुरुवातीस माध्यमिक विभागाच्या प्रश्नांसंदर्भात जिल्हा परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आढावा बैठक पार पडली. यावेळी पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक गणपत मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, उपशिक्षणाधिकारी मिना शिवगुंडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

प्राथमिक विभागाच्या आढावा बैठकीत आमदार तांबे यांनी विविध प्रश्नांचा उहापोह केला.निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणी,पदवीधर वेतनश्रेणी, पदोन्नती, बीएलओ, नैसर्गिक वर्ग वाढ, मेडिकल बिले, विस्तार अधिकारी प्रमोशन, मिशन आरंभ योजना, निलंबन प्रस्ताव, थकीत बिले यासारख्या अनेक प्रश्नांवर उपस्थित शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रश्न उपस्थित केले.प्रत्येक प्रश्नाचा सखोल आढावा घेताना प्रशासनाकडून त्यांची बाजू मांडण्यात आली.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक ‘जनता आवाज’, मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11